मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ६३ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



युक्रेन युद्धात 6 लाख रशियन सैनिकांचा मृत्यू पान ८

# मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा

## ठाण्यात दररोज एका महिलेवर होतो बलात्कार

**सुनील ओसवाल**
■ **मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे या बालेकिल्ल्यात दररोज एका महिलेवर बलात्कार होत असल्याचा गुन्हा नोंद होत आहे. मुख्यमंत्री शिंदेंच्या मतदारसंघात ही भयंकर स्थिती असताना राज्यातील महिलांना सरकार कोणतीही सुरक्षिततेची हमी न देता लाडकी बहीण योजना राबवल्यानंतर मात्र तिचे श्रेय घेण्यासाठी राजकीय मंडळींमध्ये चढाओढ लागलेली असल्याचे दिसून येत आहे.





महिलांचे तारणहार आपणच आहोत, अशा थाटात लाडकी बहीण योजना राबवली असताना या लाडक्या बहिणींसह तिची लेकही सुरक्षित नाही. ठाणे पोलिस आयुक्तालयात दररोज एका महिलेवर बलात्कार होत असल्याचा गुन्हा नोंद होत आहे. विनयभंगाच्या घटनाही त्याच संख्येने आहेत. गेल्या दीड वर्षात 531 अत्याचाराच्या, तर 922 विनयभंगाच्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे. महिलांना कुठेच सुरक्षित वातावरण नसल्यामुळे महिलांमध्ये भीतीची भावनाही वाढू लागली आहे.

गेल्या दीड वर्षात महिन्याला अत्याचार आणि विनयभंग गुन्ह्यांच्या नोंदीची आकडेवारी सरासरी 100 च्या आसपास आहे. काही दिवसांपूर्वी डायघर येथील मंदिरात महिलेवर पुजारी व त्याच्या साथीदारांनी अत्याचार करत तिची निर्घृण हत्या केली. अंबरनाथ शहरात वडिलांच्या 75 वर्षीय मित्राकडून 17 वर्षीय मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी अंबरनाथ पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान बेलापूर येथील श्री गणेश मंदिर परिसरात 30 वर्षीय अक्षता म्हात्रेवर सामूहिक अत्याचार करत तिची हत्या करण्यात आल्याची घटना 9 जुलैला उघडकीस आली. दरम्यान ,उरण येथे राहणारी 20 वर्षीय तरुणी यशस्वी शिंदे हिची 25 जुलै रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. दाऊद शेख या तरुणाने तिला भेटायला बोलावले. त्या वेळी त्यांच्यात वाद होऊन दाऊदने तिच्यावर चाकूने वार करत तिची हत्या केली होती.

| जुलै 2024 पर्यंतचे गुन्हे | अत्याचार-170 | विनयभंग -297 |
|---|---|---|
| 2023 मधील गुन्हे | अत्याचार-361 | विनयभंग - 624 |
| गेल्या दीड वर्षांत महिन्याला अत्याचार, विनयभंग गुन्ह्यांच्या नोंदीची सरासरी आकडेवारी 100 जवळपास आहे. | | |

## पालकमंत्री ठाणे जिल्ह्यात फिरकतच नाहीत

**1500 रुपये घ्या आणि कोणतीच अपेक्षा ठेवू नका**



मुख्यमंत्री शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात महिलांवर अत्याचार होत असतांना लाडक्या बहिणीला पैसे नव्हे तर सुरक्षेची गरज आहे. ठाणे हा मुख्यमंत्र्यांचा बालेकिल्ला असून येथील महिलांना ते सुरक्षेची हमी देऊ शकत नसतील तर राज्यातील महिलांना कशी देतील? 1500 रुपये घ्या आणि कोणतीच अपेक्षा व्यक्त करू नका अशी योजना सरकार राबवत आहे का ?

**- विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेता**



ठाण्यात गुन्हेगार मोकाट असून ज्यांना जेलमध्ये टाकायचे ते पोलीस संरक्षणात फिरत आहेत. या अगोदर 4- 5घटना घडल्या आहेत. बदलापूर घटनेची वेळीच दखल घेतली गेली नाही. पालकमंत्री साताऱ्याचे असून ठाण्यात ते नसतात त्यामुळे येथे कोणी वाली नाही. गुन्हेगार कोणत्या पक्षाचा आहे हे महत्वाचे नाही, गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो .

**राजन विचारे,**
**माजी खासदार**

# नराधम अक्षय शिंदेची 3 लग्ने, तिन्ही बायका गेल्या सोडून...

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

बदलापूरमध्ये लैंगिक शोषण केलेल्या नराधम अक्षय शिंदेला 26 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. अक्षय कर्नाटकातील गुलबर्गा गावातील असून त्याचा जन्म बदलापूरमधील खरवई गावात झाला. गावातील महिलांशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, अक्षयचे तीन वेळा लग्न झाले होते. पण कोणतीही पत्नी सध्या त्याच्यासोबत राहत नसल्याचे समजते. अक्षयचे शिक्षण दहावीपर्यंतच झाले आहे. तो खरवई गावातील एका चाळीत आई-वडील, भाऊ आणि भावाच्या पत्नीसोबत राहत होता. मात्र गावकऱ्यांनी त्याच्या घरावर हल्ला करून तोडफोड केली आहे. या घटनेनंतर अक्षय आणि त्याचे कुटुंब खरवई गावातून गायब झाले आहेत.



***एका रात्रीत 300 गुन्हे दाखल तर 68 जणांना अटक***

*पोलिसांनी एका रात्रीत 300 आंदोलकांवर गुन्हा दाखल केल्याची आणि 68 जणांना अटक केल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी याप्रकरणातील पीडित कुटुंबाची तक्रार दाखल करून घेण्यासाठी 12 तास लावले होते आणि त्यांना त्रासही दिला होता.*



***वामन म्हात्रेंवर विनयभंगासह ॲट्रॉसिटी गुन्हा***

*माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी काल एका महिला पत्रकाराशी बोलताना अर्वाच्च भाषा वापरली होती. याप्रकरणी आता त्यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा करण्यात आला आहे. बदलापुरातील ज्या शाळेत घटना घडली त्या ठिकाणी एक महिला पत्रकार बातम्या कव्हर करण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी माजी नगराध्यक्ष असलेले वामन म्हात्रे त्या महिला पत्रकाराला पाहून थांबले आणि हे प्रकरण तुम्ही पत्रकारांनी पेटवले असल्याचे बोलू लागले. यावेळी त्यांनी त्या पत्रकाराशी बोलताना जसं काही तुझ्यावरच बलात्कार झालाय, अशा बातम्या देत आहेस, अशी अर्वाच्च भाषा वापरली. वामन म्हात्रे यांचे शब्द त्या महिला पत्रकाराला खटकले आणि तिने थेट पोलीस स्टेशन गाठत वामन म्हात्रे यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी याप्रकरणी तक्रार नोंदवून घेतली नाही. यानंतर वामन म्हात्रे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली. अखेर आज त्यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा करण्यात आला.*

***बदलापूरचे आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित- मुख्यमंत्री***

*बदलापूर येथील शाळेत मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर झालेले आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा संशय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केला. कालचे आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित होते. त्याचा लाखो रेल्वे प्रवाशांना त्रास झाला. हे व्हायला नको होते. मंत्र्यांनी आंदोलकांना समजावले. त्यांच्या मागण्याही मान्य केल्या. पण त्यानंतरही ते माघार घेत नव्हते. त्यांना केवळ सरकारला बदनाम करायचे होते, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री शिंदे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, "बदलापूर येथील झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणातील जे कोणी आरोपी आहेत त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे अशा प्रकारचे निर्देश कालच पोलिस आयुक्तांना देण्यात आले आहेत. त्यानुसार कारवाई देखील सुरू करण्यात आली आहे. आरोपीवर जी काही कलमे आहेत, पोक्सो असेल कठोरातील कठोर कलम आरोपीवर लावण्याचे निर्देश दिले आहेत."*

# आता 'लाडका शेतकरी योजना' राबवणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची घोषणा

**प्रतिनिधी**
■ **बीड**

"आमच्या सरकारचे काम म्हणजे शेतकऱ्याच्या पिकाला थेट मार्केट देण्याचं काम आहे. आमच्या सरकारचं एकच धोरण आहे, कष्टकरी, वारकरी सुखी शेतकरी अशा प्रकारचे आपण धोरण राबवत आहे. म्हणून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आली, लाडका भाऊ योजना आली. या योजनांची आम्ही घोषणा केली, त्या योजना सुरूही केल्या. आता आम्ही 'आमचा लाडका शेतकरी योजना' सुरू करणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. आज बीडमध्ये राज्य



सरकारने कृषी महोत्सवाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी या या योजनेची घोषणा केली.

"केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान हे देणारे आहेत. त्यामुळे आज मी त्यांच्याआधी बोलत आहे, मी शेतकऱ्यांसाठी त्यांच्याकडे काहीतरी मागणार आहे, असंही शिंदे म्हणाले. 'शेतकऱ्यांच्या बांधावर जाणारे आम्ही कार्यकर्ते आहोत, आम्ही ऑफिसमध्ये बसून फेसबुक लाईव्ह करणारे नाहीत. आम्ही बांधावर जातो, असा टोलाही शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला, शेतकऱ्यांवर दुहेरी संकट येत असतं. **पान 8 वर**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पोलंड दौऱ्याला सुरुवात

## विविध कार्यक्रमांना राहणार उपस्थित



■ **वार्सा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पोलंड आणि युक्रेनच्या तीनदिवसीय दौऱ्यासाठी रवाना झाले. पंतप्रधान मोदींचे विमान पोलंडमध्ये उतरले असून येथे विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. या भेटीमुळे भारत-पोलंड मैत्रीला गती मिळेल आणि आपल्या देशांतील लोकांना त्याचा फायदा होईल, अशी त्यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. पोलंड हा देश मध्यवर्ती युरोपातील महत्त्वाचा आर्थिक भागीदार आहे.

भारत आणि पोलंड दरम्यान असलेल्या राजनैतिक संबंधांना 70 वर्षे पूर्ण होत असताना पोलंड दौरा होत आहे. दोन्ही देशांची भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने पंतप्रधान डोनाल्ड टस्क आणि राष्ट्रपती आंद्रेज डूडा यांच्या सोबतच्या बैठकींबाबत भारत उत्सुक आहे. **पान 8 वर**

## म ह त्वा चे

### 'मविआ'कडून 24 ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक

**मुंबई :** बदलापूर अत्याचाराच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीकडून 24 ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदमध्ये आघाडीतील सर्व पक्ष सहभागी होणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. बदलापुरातील एका नामांकीत शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची संतापजन घटना उघडकीस आल्यापासून राज्यातील वातावरण तापलं आहे. याच घटनेवरुन विरोधकांनी सरकारला घेरलं आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली असून हे सरकारचं अपयश असून या प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी देखील विरोधकांकडून करण्यात येत आहे.

### शरद पवारांना Z + दर्जाची सुरक्षा

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवारयांना केंद्राने Z+ दर्जाची सुरक्षा पुरवली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. पवारांना सध्या राज्याची झेड प्लस दर्जाची सुरक्षा आहे, मात्र आता त्यांना केंद्राची Z+ प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांचे वेगवेगळ्या जिल्ह्यांत दौरे सुरू झाले आहेत. काही महिन्यांपूर्वी पवारांनी मनोज जरांगे पाटील यांची उपोषणस्थळी भेट घेतली होती, त्यावेळी रस्त्यात काही आंदोलकांनी त्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले होते. तसेच, आगामी काळात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यातील राजकारण तापण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पवारांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला होता.

### अमूल जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड




**नवी दिल्ली :** ब्रँड फायनान्सच्या ग्लोबल फूड अँड ड्रिंक्स रिपोर्ट 2024 मध्ये अमूलला जागतिक स्तरावर सर्वात मजबूत फूड आणि डेअरी ब्रँड म्हणून स्थान देण्यात आले आहे. अमूलने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले-आम्हाला हे सांगताना आनंद होत आहे की, जगातील आघाडीच्या ब्रँड कन्सल्टन्सी ब्रँड फायनान्सने आपल्या अहवालात आम्हाला सर्वात मौल्यवान, मजबूत अन्न, दुग्धशाळा आणि नॉन-अल्कोहोलिक ब्रँड म्हणून मान्यता दिली आहे.

# मुंबईत पोलिसांचीच घरे असुरक्षित; एकाचवेळी 13 ठिकाणी चोरी

## घटना सीसीटिव्हीत कैद

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

गेल्या काही काळापासून मुंबईत गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. मात्र आता मुंबईला सुरक्षित ठेवणाऱ्या पोलिसांचीच घरे असुरक्षित असल्याचे समोर येत आहे. माहीम पोलीस कॉलनीत एकाच वेळी तेरा पोलिसांच्या घरात चोरी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. चोरांनी पोलिसांच्याच घरी चोरी केल्याचे या मोठ्या धाडसाची चर्चा पोलिस दलात सध्या सुरु आहे. संबंधित घटना सीसीटिव्हीमध्ये कैद झाली आहे.



16 ऑगस्टला रात्री उशिरा आणि 17 ऑगस्ट रोजी पहाटे चोरीच्या घटना घडल्या आहेत. 17 ऑगस्ट रोजी सकाळी 7.30 च्या सुमारास पोलीस क्वार्टरची देखरेख करण्यासाठी नेमलेले हवालदार राजाराम मोहिते हे चोरी झाल्याची माहिती मिळताच त्याठिकाणी पोहचले. यावेळी त्यांना 13 पोलीस अधिकाऱ्यांच्या घरी चोरी झाल्याचे समजते. बहुतेक रहिवासी रात्रीच्या वेळी घरी नसल्याने ही चोरी झाली.

चोरट्याने रात्रपाळीवर असलेले पोलीस, सुट्टीनिमित्त गावी गेलेल्या पोलिसांची घरे तसेच निवृत्त पोलिसांच्या बंद घरांना लक्ष्य केलं. सीसीटिव्हीमध्ये दिसते की, मध्यरात्री चोराने पोलीस अधिकाऱ्यांच्या दाराचे कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. त्याने पोलिसांच्या घरातून रोकड आणि मौल्यवान वस्तूंची तसेच देवाच्या चांदीच्या मूर्तीची चोरी केली. चोराने चोरी करण्याआधी घराच्या शेजारी असलेल्या घरांच्या कड्या लावून घेतल्या, जेणेकरून आवाज झाला तरी कोणीही बाहेर येऊ शकणार नाही. याशिवाय चोरट्याने पोलीस कॉलनीतील प्ले ग्रुप आणि सोसायटीचे कार्यालयही लक्ष्य केले.

याप्रकरणी माहिम पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आम्ही परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहत आहोत आणि परिसरातील गुन्हेगारांच्या नोंदीही तपासत आहोत. जेणेकरून चोरीला लवकर पकडता येईल, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली.




२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# मनसे पालघर शहर शिष्टमंडळाने जिल्हा शल्यचिकित्सककडे मांडल्या लोकांच्या समस्यां

**पालघर :** मनसे पालघर शहर शिष्टमंडळाने मा. जिल्हा शल्यचिकित्सक मराड यांची भेट घेऊन पालघर ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या लोकांच्या समस्यांचा वाचून दाखवला. रोजच्या रोज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे येणाऱ्या जनतेच्या तक्रारी आम्ही मराड यांच्या समोर मांडल्या.यामध्ये प्रामुख्याने गर्भवती महिलांना होणारा त्रास, रुग्णालयातील अस्वच्छता, रुग्णवाहिकांच्या संबंधित लोकांच्या समस्या, रुग्णांना मिळणारे निकृष्ट गुणवत्तेचे जेवण तसेच रुग्णालयातील डबक्यात होत असलेली डासांची पैदास, डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसणे इ. विषय मांडण्यात आले. यावेळी पालघर शहर अध्यक्ष निशांत धोत्रे, विभाग अध्यक्ष संजय चव्हाण, हिमांशु राऊत, विशाल कोथमिरे, उपविभाग अध्यक्ष गजानन खडके, इ. महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



# जव्हार आगाराच्या बहुतेक गाड्या नादुरुस्त; परीवहन विभागाचे दुर्लक्ष!

प्रतिनिधी
■ जव्हार

जव्हार आगारात ऐकुन ५५ एस टी बस असुन त्यावर जव्हार,मोखाडा व विक्रमगड तालुक्यातील प्रवासी अवलंबून आहेत, मात्र या आगारातील बर्याच बसेस जुन्या व मोडकळीस आलेल्या आहेत त्यामुळे त्या खिळखिळया झालेल्या आहेत. वारंवार त्यांत बिघाड होत असतो, परिणामी प्रवाश्यांना एस टी बस मध्ये बिघाड झाल्यास तास न तास दुसरी बस येईपर्यंत ताटकळत उभे राहावे लागत आल्याने प्रवाश्यांना नादुरुस्त एसटीचा नाहक ताप होत आहे.जव्हार आगारातील एस टी बस ची दररोज तांत्रिक दुरुस्ती व पाहाणी केली जात नसल्याचे सत्य समोर आले आहे .जव्हार एस टी आगारात ऐकुन ५४ मॅकेनिक( हेल्पर ) पदे मंजुर असुन त्या पैकी प्रत्यक्ष ३० मॅकेनिक ( हेल्पर ) कार्यरत असुन २४ पदे रिक्त आहेत. ही पदे भरणे गरजेचे असताना परीवहन मंत्र्यांनी एस टी महामंडळाकडे दुर्लक्ष केले आहे.

## शासनाने एस टी महामंडळाला वाऱ्यावर सोडले



'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असे ब्रीद घेऊन प्रवाशांच्या सेवेत उतरलेल्या एसटी महामंडळाच्या अनेक बसगाड्यांची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचे दिसते. जव्हार तालुक्यात दररोज रस्त्यात बस बंद पडून प्रवाशांचे हाल झाल्याचेही पाहावयास मिळत आहे.

काही बसगाड्यांमधील आसन व्यवस्था पूर्णपणे कालबाह्य झाली असून, अनेक गाड्यांच्या खिडक्या तुटून काचा गायब झालेल्या आहेत. गाड्यांचे पत्रेही फाटलेले असल्याने प्रवाशांना इच्छितस्थळी पोचेपर्यंत वेगवेगळे आवाज ऐकून घ्यावे लागत आहेत. बहुतांश लांब पल्ल्याच्या काही

बसगाड्यांची अवस्था देखील बिकट आहे.विशेष म्हणजे ग्रामीण भागात धावणाऱ्या बसगाड्यातून प्रवाशांना अगदी नाईलाजास्तव प्रवास करावा लागत आहे. प्रवाशांकडून चांगले उत्पन्न मिळत असतानाही ग्रामीण भागात चांगल्या बसगाड्यांमधून सेवा देण्यात मात्र कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. याशिवाय राखीव टायरचा अभाव, टूल बॉक्स परिपूर्ण नसणे, रिकामी प्रथमोपचार पेटी यासह इतर अनेक समस्याही बसगाड्यांमध्ये दिसून येतात. जव्हार आगारातून धावणाऱ्या बहुसंख्य बस रस्त्यावरील खड्ड्यांमुळे खिळखिळ्या झाल्या आहेत.

जव्हार आगारातून ठाणे, पुणे, धुळे, सेल्वासा आदी गावांच्या मार्गावरून बस धावतात. त्याचबरोबर ग्रामीण गावांतील बहुतांश चाकरमान्यांना एस टी चा पर्याय सोयीचा ठरत असल्याने वाहतुकीसाठी या बसचा वापर केला जातो; पण नादुरुस्त गाड्यांमुळे अनेकदा बसचे येण्याचे व जाण्याचे वेळापत्रक कोलमडून गेलेले असते. त्यामुळे प्रवाशांना तासन्तास ताटकळत बसावे लागते. एकंदरीत अत्यावश्यक सुविधेचा बोजवारा उडालेला असल्याने तसेच जीर्ण झालेल्या बसचा अपघात कधी होईल याचा काही नेम नसल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

> *महामंडळ दरवर्षी भाडेवाढ करीत असते. त्यामानाने प्रवाशांना सुविधा देण्याकडे कानाडोळा केला जातो. यामुळे प्रवाशांचा प्रवास देखील धोक्यात आला आहे. दररोज किमान एक ते दोन बस खराब होऊन रस्त्यावर बंद पडत असतात. याचा नाहक त्रास प्रवाशांनाच सहन करावा लागतो जव्हार एस टी आगार मॅकेनिक ( हेल्पर ) कमी असल्यामुळे एस टी बसची दुरुस्ती व चेकीन दररोज न करता एस टी महामंडळ प्रवाशांच्या जिवाशी खेळत आहे.त्यामुळे जव्हार आगाराने प्रवाशांसाठी सुस्थितीतील बसगाड्या उपलब्ध करून द्याव्या व एस टी गाड्यांची रोज चेकींग करुन सुव्यस्थीत गाड्या सोडाव्यात अन्यथा शिवसेनेतर्फे तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, तरी संबंधित आगारप्रमुखांनी याची दखल घ्यावी .*
>
> ***-डॉ विठ्ठल सदगीर, जेष्ठ शिवसैनिक, शिवसेना उध्दव ठाकरे गट***

# ओला इलेक्ट्रिकच्या तीन नव्या मोटरसायकली लॉन्च



**मुंबई:** भारताला जागतिक ईव्ही आणि नवीन ऊर्जा हब बनवण्याच्या आपल्या संकल्पाच पाठपुरावा करीत ओला इलेक्ट्रिकने आज रोडस्टर, रोडस्टर एक्स आणि रोडस्टर प्रो लॉंच करून कंपनीने आज इलेक्ट्रिक मोटरसायकल सेगमेंटमध्ये प्रवेश केला असल्याची घोषणा केली, पुढे आर्थिक वर्षा २०२६ च्या पहिल्या तिमाही पासून स्वतःच्या वाहनांमध्ये सेलचे एकत्रीकरण जाहीर केले. कार्यक्रमात बोलताना, ओला इलेक्ट्रिकचे संस्थापक आणि सीएमडी भावीश अग्रवाल म्हणाले की, “आज, भारताच्या बाजारपेठेत मोटारसायकलींचा समावेश आहे आणि ओलाच्या या सेगमेंटमध्ये प्रवेश केल्यामुळे, भारतीय 2W मध्ये ईव्ही प्रवेश आणखी वेगवान होईल. स्कूटर सेगमेंटमध्ये ईव्हीच्या अवलंबनाला गती देण्यात आम्ही आधीच यशस्वी झालो आहोत आणि आमच्या भविष्यातील उत्पादनांच्या पोर्टफोलिओसह, आम्ही आता आमच्या मोटरसायकलद्वारे ईव्ही विभागात प्रवेश मिळण्यावर करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. पुढील वर्षाच्या सुरुवातीस आमच्या वाहनांमध्ये आमच्या सेलच्या एकत्रीकरणासह, आम्ही संपूर्ण भारतभर मोठ्या प्रमाणावर ईव्ही वापर वाढवण्यासाठी एक नवीन धोरण तयार करण्याचा निर्धार केला आहे.” ऐसे मत त्यानी व्यक्त केले.

# आडणे गावातील खदाणमाफिया मुजोर; गाव बेचिराख होण्याच्या मार्गावर

## संधीसाधू स्थानिक ग्रामस्थांचे बेकायदा खदाणीला संरक्षण



प्रतिनिधी
■ वसई

तुंगारेश्वर राष्ट्रीय अभयारण्याच्या सानिध्यात असलेल्या आडणे गावात वर्तक नामक खदाणमाफिया हा मुजोर बनला असून अनेक विरोधानंतरही त्याला गावातून हुसकावून लावण्यात ग्रामस्थांना अपयश येत आहे. काही स्थानिक ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य खदाणमाफिया वर्तक याला पाठीशी घालत असल्याने त्याच्या कृष्णकृत्यांना ऊत आला आहे. काही पर्यावरणप्रेमी आपला गाव सुरक्षित रहावा यासाठी अनेकदा महसूल स्तरावर पाठपुरावा करूनही महसूल विभाग धृतराष्ट्रला लाजवतील अशी भूमिका घेत आहे.

आडणे गावातील ग्रामस्थ बाळाराम म्हसे हे याप्रकरणी ठोस पाठपुरावा करत आहेत. मात्र खदाणमाफिया च्या अर्थपूर्ण युतीवर महसूल विभाग थंड पडला असल्याचे चित्र दिसून येते. या गावातील खदाणीमुळे गावाची वाट बिकट झाली असून आता तर खदाणमाफिया याने अत्याधुनिक यंत्रे येथे आणून गावाच्या पर्यावरणाचे लचके तोडायला घेतले आहेत. त्यामुळे गावावर भुस्खलनासारखा धोका आहे. मागे खदाणीत होणाऱ्या ज्यादा क्षमतेच्या स्फोटामुळे येथील आदिवासी नागरिकांच्या घरातील पत्रे तुटून पडले होते. स्थानिक आदिवासींच्या घराला भगदाडे पडली आहेत. तर काही घरे कोसळण्याच्या स्थितीत आहेत.

आता खदाणमाफिया याने अत्याधुनिक यंत्रे आणल्याने गावातील पर्यावरण व स्थानिकांच्या घरांना मोठा धोका उद्भवला आहे. अनेक नागरिक तर या खदाणमाफियाच्या उपद्रवाने मेटाकुटीला आले आहेत. सार्वजनिक वाहतुकीचा रस्ता या खदाणमाफिया च्या स्वार्थी वृत्तीमुळे वाहून गेला आहे. मात्र तरीही त्याला स्थानिक सदस्य व काही संधीसाधू ग्रामस्थ खतपाणी घालत असल्याने संताप व्यक्त होत आहे. आख्ख्या गावाला वेठीस धरणाऱ्या खदाणमाफियाला संरक्षण लाभत असल्याने तहसीलदार अविनाश कोष्टी यांनी तरी कारवाई करावी, असे आवाहन बाळाराम म्हसे यांनी केले आहे.

# 'मार्ड'च्या शिष्टमंडळाने घेतली अतिरिक्त पलिका आयुक्त बांगर यांची विशेष भेट

■ मुंबई

मेडिकल असोसिएशन ऑफ रेसिडन्ट डॉक्टर्स (मार्ड) संघटनेच्या शिष्टमंडळाने आपल्या विविध मागण्यांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांची काल बैठक घेतली. याप्रसंगी शिष्टमंडळांने प्रामुख्याने कार्यक्षम सुरक्षा व्यवस्था, रहिवासी डॉक्टरांशी संबंधित सोयी सुविधा, सीसीटीव्ही यंत्रणा, विविध चाचण्यांच्या ठिकाणची रूग्णांच्या नातेवाईकांची गर्दी यासारख्या विषयांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. शिष्टमंडळाने केलेल्या सुचना आणि मागण्यांबाबत यावेळी सकारात्मक चर्चा झाली. तसेच शिष्टमंडळाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर प्राधान्याने उपाययोजना करण्यात येतील, असे बांगर यांनी शिष्टमंडळाला आश्वस्त केले.

रूग्णालय परिसरात नेमण्यात येणारी सुरक्षा व्यवस्था ही कार्यक्षम असावी. तसेच एखाद्या घटनेला किंवा प्रसंगाला प्रतिसाद देण्याच्या अनुषंगाने सुरक्षा यंत्रणेच्या सहभाग तत्पर व प्रसंगावधान दाखवणारा अपेक्षित आहे. . सुरक्षा रक्षकांना कामाच्या ठिकाणी वेळोवेळी रोजच्या कामांमधून अद्ययावत स्वरूपाच्या प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचे बांगर यांनी सांगितले.

# प्रशासकीय राजवट घातक
# वाढती लोकसंख्या, अनधिकृत बांधकामांचा मोठा स्फोट; अधिकारी सुस्त

प्रतिनिधी
■ वसई

वसई -विरार शहर महापालिकेच्या हद्दीत अनधिकृत बांधकामांचा मोठा बोजवारा उडाला आहे. या बांधकामांना महापालिका प्रशासनातील प्रशासकीय राजवट कारणीभूत आहे. महापालिका निवडणुक खोळंबल्याने प्रशासकीय काळात महापालिका हद्दीत नागरी सुविधांचा बोजवारा उडाला आहे.

वसई- विरार शहर महापालिकेची स्थापना झाल्यापासून अनधिकृत बांधकामांचा आलेख उंचावला आहे. मागील ४ वर्षात तर महापालिका प्रशासन प्रशासकाच्या हातात एकवटल्याने अनधिकृत बांधकामांचा अक्षम्य स्फोट झाला आहे. त्यात मोठ्या प्रमाणात उत्तर भारतीय नागरिक वास्तव्याला आले आहेत. महापालिकेत बोगस सिसी घोटाळा ताजा असताना आयुक्त अनिलकुमार पवार वाढत्या अनधिकृत बांधकामांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपू लागले आहेत. त्यामुळे प्रशासकीय काळ हा वसई,विरारसाठी घातक ठरला आहे.

प्रत्येक विभागात अनधिकृत बांधकामांचा जोर वाढला आहे. यात पेल्हार, चंदनसार, वालीव हे विभाग तर अनधिकृत बांधकामांचा अड्डा बनले आहेत. येथे होणाऱ्या प्रत्येक अनधिकृत बांधकामात महापालिका अधिकाऱ्यांची छुपी अर्थपूर्ण युती आहे, असा आरोप होत आहे. पेल्हार विभागात तर विभागीय कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. मात्र तरीही अधिकाऱ्यांना त्याचे सोयरसुतक पडलेले नाही. त्यामुळे प्रशासकीय राजवट ही भूमाफिया यांच्या पथ्यावर पडली आहे. वाढत्या अनधिकृत बांधकामात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली आहे. त्यामुळे वसईतील वाहतुकीवर त्याचा ताण येत आहे. पालिका आयुक्तांनी किमान याप्रश्नी गांभीर्यपूर्वक पाहणे गरजेचे आहे. असे मत व्यक्त होत आहे.

# मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात 'खादी महोत्सव'

प्रतिनिधी
■ मुंबई

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट रोजी सर्व भारतीयांना खादीचा कपडा खरेदी करावा असे आवाहन केले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने पंतप्रधान त्यांच्या आवाहनास अनुसरून मंत्रालयात खादी महोत्सवाचे आयोजन केले आहे. आज दिनांक २१ ऑगस्ट रोजी या महोत्सवाची सुरुवात झाली आहे तर दिनांक २३ ऑगस्ट रोजी या महोत्सवाची समाप्ती होईल. महाराष्ट्रातील एकूण १२ स्टॉल्स जे खादी चे उत्पादक आहेत त्यांचे स्टॉल्स



उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये विविध प्रकारचे कपडे, जॅकेट्स, महिलांसाठी साड्या, ड्रेस, मध अशा प्रकारचे अनेक स्टॉल्स लागले आहेत. त्यामुळे प्रत्येक भारतीयांनी खादीचा कपडा खरेदी करावा. रुमाला पासून ते साडी पर्यंत काहीही असेल तर ते खरेदी करावे असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे यांनी केले आहे. या प्रदर्शनाला उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी भेट देऊन खादी च्या विविध स्टाल ची पाहणी केली तसेच जास्तीत जास्त लोकांनी खादी खरेदी करणेबाबत आवाहन केले.

इतर राज्यांमधून जसे की उत्तरप्रदेश आणि आसाम मधून काही लोक आले आहेत. विनोबा भावे यांची संस्था विनोबा ग्राम संघ, सेवाग्राम संस्था कडून खादी च्य वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या महोत्सवाचा आनंद घ्या असे आवाहन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर विमला यांनी केले आहे.




***मुंबई :** माजी खासदार राहुल रमेश शेवाळे यांनी दिव्यांग बांधवांच्या शिष्टमंडळासह महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल श्री राधाकृष्णन यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी दिव्यांग बांधवांसाठी कार्य करणाऱ्या मानव विकास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह शेवाळे यांनी दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांकडे माननीय राज्यपालांचे लक्ष वेधले.*




***मुंबई:** गोदी विभागातील शेड सुप्रीटेंडंट, मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे सेक्रेटरी व मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे बोर्ड मेंबर दत्ता खेसे आणि लेखा विभागातील ऑफिस सुप्रीटेंडंट, ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनच्या खजिनदार व मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या बोर्ड मेंबर कल्पना देसाई यांचा मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या वतीने पोर्टच्या बोर्ड रूममध्ये चेअरमन राजीव जलोटा यांच्या हस्ते शाल व सन्मानचिन्ह देऊन मंगळवारी सत्कार करण्यात आला.*


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीव्दारे कळविणेत येते की, उपअधिक्षक भुमिअभिलेख, वसई येथील गांव वसई, तलाठी सजा मुळगांव ता. वसई जि. पालघर यांचे हद्दीतील गांव मौजे मुळगांव येथील १) सि. स.नं. ३३३६ / प. नं. २ पो क्षेत्र: - ६०३.७० चौ. मी. २) सि. स.नं. ३३३७ / अ क्षेत्रः -३४६.१० चौ. मी. ३) सि. स.नं. ३३३७ / ष क्षेत्र: - २३.४० चौ. मी. ४) सि. स. नं. ३३३९/ब क्षेत्रः - २३.४० चौ. मी. ५) सि. स.नं. ३३३५/प.नं. २ पो क्षेत्र:- ३४८.७० चौ.मी. ६) सि. स.नं. ३३४२ / ब क्षेत्र: - १०१.१७ चौ. मी. अशी वरील उल्लेखीत सर्व जमिन मिळकतीचे मुळ मालक यांच्या बरोबर आमचे अशिल मे. ऑलिव होराईझन प्राईव्हेट लिमिटेड यांनी सदर जमिन मिळकती संदर्भात नोंदणीकृत विकसीत करारनामा केलेला असून आमचे शिल यांनी सदर जमिन विकसीत करणेची परवानगी मिळणेकरीता वसई विरार शहर महानगरपालिका विरार यांचेकडेस विनंती अर्ज केला आहे.

तरी सदर जमिन मिळकती संबंधी कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थेचा खरेदी, विक्री, दान, अदलाबदल, गहाणखत, कुळरग, विश्वस्त, दावा, ताबा, बक्षिसपत्र, वारस, भाडेपट्टा, मृत्युपत्र, इजमेंट वारस किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत लेखी पुराव्यासह आपली हरकत खालील पत्यावर कळवावी.

जर मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचीही हरकत नाही असे गृहित धरून दाखला देणेत येईल त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही व पुढे योग्य तो निर्णय घेणेत येईल.

पत्ता :
**ॲड. रमजान अली मलिक**
१५, संस्कृती बिल्डींग, जी. जी. कॉलेज जवळ, कोर्ट रोड, वसई प. ता. वसई जि. पालघर पि. नं. ४०१२०१
मो. नं. ८३६९१८३६२०

**- / सही**

## वसई विरार शहर महानगरपालिका
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
मुख्य कार्यालय - विरार दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९ / २४०३४४२ / २४०२५६३

जा.क्र. वविशम / कवि / १२९ / २०२४-२५ दि. २०/०८/२०२४

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येहते प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिद्धझाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन कर दात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज- | NL02/430/11 | 2317 | सी.एम प्रजापति | निहालउद्दीन शकालउद्दीन शेख |
| 2 | तुळींज- | NL02/665/7 | 2319 | फईमुद्दीन शेख | गुलशन फहीमुद्दीन शेख |
| 3 | तुळींज- | NL02/28/11 | 2323 | रामनिधेश ए. नांगबंसी | सुनिता विनोद पटवा |
| 4 | तुळींज- | NL02/703/31 | 2325 | मोहम्मद आरिफ बहादुर | अफसाना बेगम मजीद अहमद शेख |
| 5 | तुळींज- | NL02/802/19 | 2327 | सुजीत रामजी विश्वकर्मो | आयशा अल्पेश पारावे |
| 6 | तुळींज- | NL02/526/19 | 2330 | मोहम्मद रशीद इसरार अन्सारी | शबीना बेगम मो. इमित्याज |
| 7 | तुळींज- | NL02/679/34 | 2333 | सदरे आलम | सीनु गोन्वा |
| 8 | तुळींज- | NL02/860/32 | 2337 | नसीरुद्दीन कोदन अली खान | मीना वाहीद खान |
| 9 | तुळींज- | NL02/507/43 | 2339 | अबरार खान | मो. शौकत अली मो. नेवाजी अन्सारी |
| 10 | तुळींज- | NL02/625/40 | 2342 | साखरी किरन मालोंडे | संतोष कुमार ब्रम्हचारी जैसवाल |
| 11 | तुळींज- | NL02/153/39 | 2345 | राजाराम सखाराम भितळे | अशोक नहानु परब |
| 12 | तुळींज- | NL02/394/19 | 2353 | लिलावती कंस्ट्रक्शन / रामचंद्र रामधनी यादव | रूबी जितेंद्र मिश्रा |
| 13 | तुळींज- | NL02/490/25 | 2357 | अनिला विनोद पाण्डे | खैरुनीसा सलीम सय्यद |
| 14 | तुळींज- | NL02/668/5 | 2363 | रविंद्र लालचंद गुप्ता | अशरफी लाल जगन्नाथ |
| 15 | तुळींज- | NL02/197/14 | 2390 | नितिन चंद्रकांत सोनावने | मंथन विनोदभाई बारोट |
| 16 | तुळींज- | NL02/762/35 | 2402 | शेख मुजाहिद अब्दुल अजिज | गंगाधर राजमणी पाण्डेय |
| 17 | तुळींज- | NL02/400/23 | 2404 | पदमा डि भाटकर | अरूण सिताराम धुरी |
| 18 | तुळींज- | NL02/762/52 | 2406 | मुजाहिद अब्दुल अजिज शेख | सुफियान अहमद |
| 19 | तुळींज- | NL02/762/40 | 2408 | शेख मुजाहिद अब्दुल अजिज | सुफियान अहमद |
| 20 | तुळींज- | NL02/568/27 | 2410 | अनिला मुझम्मील शेख | कादिर अकबर अली खान |

**सही/-**
**प्र सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

## महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, गाव मौजे कुरगाव ताः पालघर येथील सर्व्हे नं ६२, हिस्सा नं २, व सर्व्हे नं ६३, प्लॉट नं १ व २ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या टाइप- ए या इमारतीमधील सदनिका क्र . ३०३ ज्याचे क्षेत्र ७२३ • ३५ चौ. फुट कारपेट म्हणजेच १००६ चौ. फु. बिल्ट अप ही मिळकत माझे अशील श्री. सुभाष रतीलाल पारेख यांच्या मालकी व कब्नेवहीवाटीची असुन सदर मिळकतीच्या मालकीचा दस्त क्र. पलर - २ - ८२६ - २०१४ हा मुळ दस्त गहाळ झाला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, तारण, कुळवहिवाट, वारसा, भाडेपटटा, वहिवाट, किवा अन्य स्वरूपाचा दावा असल्यास त्यांनी त्याची लेखी स्वरूपातील महिती योग्य कागदोपत्री पुराव्यानिशी निम्नस्वाक्षरीकर्ता ॲड. जितेश एकनाथ म्हात्रे यांच्याकडे बी / ३०१, सुगंधी हाइटस, बोळींज खारोडी नाका, दिशा हॉटेल जवळ, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर येथे या सुचनेच्या प्रसिध्दीपासुनच्या १४ दिवसाच्या आंत पाठवावी . वर दिलेल्या मुदतीत जर हरकत पोहचली नाही तर सदर मिळकतीचा व्यवहार हरकत विरहित आहे व हरकत असल्यास सोडुन दिली आहे असे गृहित धरले जाईल.

**ॲड. जितेश एकनाथ म्हात्रे.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. दिनेश वसंतलाल दोशी यांच्याकडून त्यांच्या मालकीचा भाईंदर (पूर्व) ता. व जि. ठाणे ४०११०५, गोडदेव रोड, येथील स्वस्तिक इंडस्ट्रीयल इस्टेट मधील गाळा क्र. सी/२२ (जुना गाळा क्र.५०), क्षेत्र २७६ चौ फुट बिल्टअप खरेदी करण्याच्या विचारात आहेत व त्याबाबत दोन्ही पक्षकारामध्ये बोलणी चालू आहेत. सदर गाळ्याची कागदपत्रे तपासली असता सदर गाळा श्री स्वस्तिक कंस. कंपनीने १२ नोव्हेंबर १९८२ च्या करारनाम्याने श्री अंबिका डाय आणि केमिकल्स कंपनी यांना विकला आहे. व २६ जुलै १९९१ च्या करारनाम्याने श्री अंबिका डाय आणि केमिकल्स कंपनीने चाक्राफ्टमेन इनकॉर्पोरेशन या कंपनीला विकला आहे व दि. १६ मे १९९३ च्या करारनाम्याने चाक्राफ्टमेन इनकॉर्पोरेशन या कंपनीने सदर गाळा दिनेश वसंतलाल दोशी यांना विकला आहे. सदर गाळ्याचे १६ मे १९९३ चा करारनामा गहाळ झाला असून शोधूनही मिळत नाही. सदर गळ्याचे मला नो क्लेम सर्टिफिकेट देण्याची विनंती केली आहे.

तरी सदर गाळयावर, त्याच्या वरील मूळ करारनाम्यावर कुणाचाही हक्क, हितसबंध, गहाणवट, वारसाहक्क वगैरे असल्यास तसेच सदर गाळयाचा वर वर्णन केलेला मूळ करारनामा, कुणाला मिळाला असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत लेखी, योग्य त्या कागदपत्रासह ऑफिस क्र.२, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईंदर (पू), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५ येथे कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास सदर गाळयावर, त्याच्या वरील करारनाम्यावर, कुणाचाही हक्क नाही व असल्यास असल्यास सोडून देण्यात आला आहे असे समजून त्या बाबत माझ्या अशिलाला नो क्लेम सर्टिफिकेट देण्यात येईल व सदर गाळा माझे अशिल खरेदी करतील याची नोंद घ्यावी.
कळावे,

**जॉन एम रॉड्रीक्स**
**वकील**
**मो. नं. - ९८९२४०१३४९**

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील श्रीमती लीलावंती तलक्षी नंदू, श्री. तलक्षी लालजी नंदू आणि श्रीमती दीपा गिरीश सावला या सराफ चौधरी नगर को-ऑप हौसिंग सोसायटी (क्र. ११) लि.च्या संयुक्त सदस्य व सदनिका क्र. बी- १७/००१ सराफ चौधरी नगर, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१. चे मालक आहेत. (यापुढे "सदर सदनिका" म्हणून संबोधले जाईल).

सदर श्री. तलाक्षी लालजी नंदू यांचे ०९/०७/२०२४ रोजी मुंबई येथे निधन झाले, त्याचा नोंदणी क्र. डी- २०२४२७९०२७५०००४७०६ दिनांक ०३/०८/२०२४. (यापुढे "सदर मयत " म्हणून संबोधले जाईल) त्यांच्या मागे हयात असलेले १) श्रीमती लीलावंती तलक्षी नंदू (पत्नी) आणि २) श्रीमती दीपा गिरीश सावला (लग्नापूर्वीचे नाव मिस. दीपा तलाक्षी नंदू-मुलगी) फक्त कायदेशीर वारस आहेत. उक्त सदनिकेत असलेले सदर मयताचे अविभक्त ३३.३३% हक्क, शीर्षक, आणि शेअर हे माझे अशिलाचे नावावर हक्क सोडपत्राने हस्तांतरित करण्याची इच्छा आहे.

तरी उपरोक्त सदनिकेवर इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क, शीर्षक आणि स्वारस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीने/त्याने ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर खाली स्वाक्षरी केलेल्यांना कळवावी. या अंतर्गत, अशा दस्तऐवजांच्या प्रती आणि उक्त सदनिकेवर त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ इतर पुरावे. उपरोक्त वेळेत सादर करावे. कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास, असे गृहीत धरले जाईल की कोणतेही दावेदार नाहीत आणि माझे अशील सदर सदनिकेचा व्यवहार करण्यास मोकळे असतील.

**ठिकाण: मुंबई**
**तारीख:२२/-८/२०२४**

**सागर बी भोसले**
**वकील उच्च न्यायालय,**
**मुंबई ए-७, तळ मजला, सराफ चौधरी नगर,**
**ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली ई, मुंबई ४००१०१.**


Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 63**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ६३**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई :कांजूर विभागातील डिमेलो चाळ, संभाजीनगर येथील सार्वजनिक शौचालयाचे लोकार्पण आमदार सुनिल राऊत यांच्या हस्ते म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम यांच्या उपस्थितीत करण्यात आले त्याप्रसंगी अनंत पाताडे, दिपाली पाटील, रवि महाडिक, मामी मंचेकर, प्रभु गवस, सुधाकर पेडणेकर, महेश पाताडे, श्वेता पावसकर, सचिन चोरमुले, मीनाक्षी पाटील इ. कार्यकर्ते उपस्थित होते.*



# खारदांडा येथे दोन अल्पवयीन मुलींचा शेजाऱ्याकडून विनयभंग

प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराचे प्रकरण ताजे असतानाच मुंबईच्या खार दांडा परिसरात देखील अशीच एक संतापजनक घटना उजेडात आली आहे. यात दोन सख्या अल्पवयीन बहिणींचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी मुलींच्या आई - वडिलांनी खार पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर आरोपी विरोधात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय.

विनयभंगाच्या याप्रकरणी खार पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अमन सिंग असून तो तक्रारदार फिर्यादींच्या शेजारी राहणारा असल्याची माहिती पुढे आली आहे. सध्या खार पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. मात्र या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली असून परिसरातून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

## राज्यातील महिला अत्याचारांच्या प्रकाराने नागरिक संतप्त



कोलकातामध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या महिला डॉक्टरचा अमानुष छळ आणि त्यानंतर तिची हत्या केल्याच्या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. ही घटना ताजी असताना अशीच एक धक्कादायक घटना बदलापूर शहरात घडली. बदलापूरच्या एका नामांकित शाळेतील चार वर्षांच्या दोन मुलींवर शाळेतील सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याच्या संतापजनक प्रकार उजेडात आला. या संपूर्ण प्रकारचे पडसाद आता राज्यासह देशातही उमटत असताना राज्यात गेल्या दोन दिवसात अशाच प्रकारचे अनेक प्रकरण पुढे आले आहे. त्यातच खारच्या प्रकाराने मुंबईतही संतापाचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे सुसंस्कृत आणि पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात नेमकं चाललंय तरी काय? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जाऊ लागला आहे.

### *कान टोचण्याच्या बहाण्याने मुलीचा विनयभंग*

*राज्यात बदलापूर येथे दोन अल्पवयीन मुलींना अत्याचार करण्यात आल्याने राज्यात संतापाची लाट आहे. त्यानंतर आता राज्याची राजधानी मुंबई येथील नागपाडा येथे आठ वर्षाच्या मुलीवर एक कट्टरपंथी युवकाने लैंगिक अत्याचार केले आहेत. आरोपीचे नाव जुबेर शाह असून तो पेशाने दागिन्यांचा व्यवसाय करतो. कान टोचन्याच्या बहाण्याने लहान मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील नागपाडा येथे एका जुबेर शाह नावाच्या युवकाने लहान मुलीच्या शरिराला चुकीचा स्पर्श केला होता. त्यामुळे जुबेरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणात आता नागपाडा पोलिसांनी जुबेरला अटक केली आहे. याप्रकरणात पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले गेले आहे.*

# गुन्हे शाखेप्रमाणेच महिला आणि मुलांच्या सुरक्षेसाठी पोलिस ठाण्यात युनिट स्थापन करण्याची गरज

## राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शहा यांचे मत

प्रतिनिधी
■ मुंबई



बदलापूरमधल्या एका शाळेत दोन चिमुरड्या मुलींवर अत्याचाराचे प्रकरण उघडकीला आले आहे.त्याबाबत राज्यभरात सर्वत्र संताप व्यक्त होतोय. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी ज्या प्रमाणे पोलीस ठाण्यात गुन्हे शाखा युनिट असते. त्याचप्रमाणे महिला आणि मुलांच्या सुरक्षेसाठी समर्पित युनिट निर्माण करण्याची गरज असल्याचे मत राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष ॲड. सुशीबेन शहा यांनी व्यक्त केले. वरळी इथल्या आयोगाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार त्या बोलत होत्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानासाठी अनेक धाडसी निर्णय घेतले आहेत. त्यामुळे अशा समर्पित शाखेची स्थापना या सरकारच्या कार्यकाळातच शक्य आहे. याबाबत आपण पाठपुरावा करू असे सांगून प्रत्येक पोलिस ठाण्यात या विशेष शाखांची त्वरीत स्थापना करावी. या शाखांमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण मिळावे, अशी शिफारस आयोगाकडून केली जाईल असेही त्या म्हणाल्या.

पोलिस ठाण्यांमधील गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी केवळ गुन्ह्यांच्या तपासासाठी राखीव असतात. बहुदा अशा अधिकाऱ्यांकडे इतर कामं सोपवली जात नाहीत. गुन्ह्यांचा सक्षमपणे तपास आणि निराकरण करणे ही त्यांची एकमेव जबाबदारी असते. याच धर्तीवर महिला आणि मुलांच्या सुरक्षेसाठी असे युनिट्स करणे गरजेचे असल्याचे शहा यांनी स्पष्ट केले.

ॲड. शहा यांनी शाळा व्यवस्थापनालाही धारेवर धरले. शाळेत मुलांच्या सुरक्षेसाठी काही नियम असतानाही या शाळेने त्या नियमांचे पालन केले नाही. शाळेत शिपाई म्हणून पंधरा दिवस वावरत असताना त्या व्यक्तीची शाळेने चौकशी केली नव्हती का? तसेच लहान मुलींच्या वॉशरूमपर्यंत जाण्याची परवानगी त्याला कशी देण्यात आली असेही शहा यांनी म्हटले आहे. शाळांनी मुलांच्या सुरक्षेबाबत अस्तित्वात असलेल्या नियमांचे काटेकोर पालन केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

### *तक्रार नोंदवून घेण्यासाठीचा विलंब हेच गोंधळाचे कारण*

*बदलापूर मधील शाळेतील घटनेमागे पोलिसांनी तक्रार नोंदवून घेण्यासाठी केलेला तब्बल ११ तास उशीर हे सर्वात मोठे गोंधळाचे कारण असल्याचे राज्य बाल हक्क आयोगाने म्हटले आहे. बदलापूर येथील घटने संदर्भात राज्य बाल हक्क आयोगाने गंभीर दखल घेतली असून या संदर्भात त्यांनी कडक ताशेरे ओढले आहेत. अकरा तासानंतर या प्रकरणाची एफआयआर दाखल झाली. हाच खरा प्रॉब्लेम असल्याचे बाल हक्क आयोगाने म्हटले आहे. या प्रकरणात तात्काळ गुन्हा दाखल करायला हवा होता, असे देखील बाल हक्क आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शहा यांनी म्हटले आहे.*



*मुंबई : शिवसेना (उद्धवसाहेब बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बदलापूर पूर्व येथील एका नामांकित शाळेत दोन चिमूरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधात ईशान्य मुंबई विभाग क्रं.०८ च्यावतीने बुधवारी घाटकोपर पश्चिम रेल्वे स्थानक येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी विभागसंघटिका सौ.प्रज्ञाताई सकपाळ, ईशान्य मुंबई विभाग क्रं.०८ मधील तीनही विधानसभेचे सर्व महिला/पुरुष पदाधिकारी, अंगीकृत संघटना पदाधिकारी, शिवसैनिक,युवासैनिक तसेच विभागीय जनता मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## ठाकरे शिवसेनेचे पोलिस महासंचालकाला निवेदन



*मुंबई :बदलापूर भागात एका नामांकित शाळेत दोन चिमुरडयांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या धक्कादायक घटनेमुळे समाजात भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपींला कठोर शिक्षा देण्यासाठी खटला जलगती न्यायालयात चालवून पीडित कुटुंबियांना न्याय द्यावा, अशी मागणी करणारे निवेदन काल महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक (डीजीपी) रश्मी शुक्ला यांना शिवसेनेच्या( उध्दव ठाकरे) वतीने पत्यक्ष भेट घेऊन दिले. यावेळी विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, माजी महापौर किशोरी पेडणेकर, पालिकेतील माजी सभागृह नेत्या विशाखा राऊत, माजी नगरसेविका राजुल पटेल व इतर महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.*

# अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी शासन व समाजाच्या सहभागाची आवश्यकता -डॉ. नीलम गोऱ्हे

प्रतिनिधी
■ मुंबई

शालेय परिसरात मुलींवरील अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी शासन व समाजाच्या सहभागाची आवश्यकता आहे. असे सांगून मुलींच्या सुरक्षेत वाढ करण्यासाठी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे या महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण, गृह विभाग, उच्च व तंत्र शिक्षण, परिवहन, सामाजिक न्याय, नगरविकास, आदिवासी विभाग व आवश्यक इतर विभागाच्या तात्काळ बैठका घेणार आहेत.

बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर शाळेमधील स्वच्छता गृहात लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती काल समजल्यानंतर डॉ.नीलम गोऱ्हे या ताबडतोब कोल्हापूर दौऱ्यातून लगेच बदलापूरला गेल्या. तिथे त्यांनी घटनेची तपशीलवार माहिती घेतली त्यातून जे मुद्दे समोर आले त्यामध्ये एक मुद्दा समोर आला की, पॉक्सोच्या संदर्भातल्या ज्या मुलींच्या केसेस आहेत त्यात मुलीच्या वयानुसार तिच्याशी संवेदनशील पद्धतीने बोलून ती तक्रार नोंदवण्यासाठी एसओपी व त्यावर पुनर्विचार करणे गरजेचे आहे. असे त्या म्हणाल्या.

लहान मुलीवर शाळेत झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी पोलिसांकडून जी दिरंगाई केली त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे मुख्याध्यापकांनी स्वतः घटना घडल्याबरोबर किंवा पालकांनी माहिती सांगितल्या बरोबर त्याकडे दुर्लक्ष केले आणि गुन्हा नोंदवण्यासाठी टाळाटाळ केली ही एक अत्यंत गंभीर अशी अपप्रवृत्ती समोर आली आहे. तसेच ज्या शैक्षणिक संस्थेत घटना घडल्यानंतर स्वतःची बदनामी होऊ नये म्हणून या घटनेसंदर्भात तक्रार करणाऱ्या लोकांचे मनोधैर्य खच्ची करायचे काम काही लोक करतात ही अतिशय गंभीर बाब असून, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपसभापती या नात्याने विविध शैक्षणिक संस्थांशी, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि संबंधित शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्या बैठका पुढील आठवड्यामध्ये घेणार आहेत.

आज आरोपीची जामिनाची मुदत संपते, पोलीस त्याच्या कस्टडी ऐवजी त्याला अधिक कुठल्याही परिस्थितीत जामीन मिळता कामा नये याबद्दल कालच पोलिसांनी अशा पद्धतीची योग्य पावलं टाकली. याबाबत डॉ.गोऱ्हे यांनी पोलिसांशी चर्चा केली. मुलींनी बालसमूपदेशकांशी बोलून पुढच्या चार-पाच दिवसात मनावर जो आघात झालाय तो दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना डॉ.गोऱ्हे यांनी पोलिसांना केल्या आहेत.

# निवासी डॉक्टर संघटनांनी पुकारलेल्या संपाला जे.जे.हॉस्पिटल तृतीय श्रेणी संघटनेचा जाहीर पाठिंबा

प्रतिनिधी
■ मुंबई

९ ऑगष्ट २०२४ रोजी कोलकत्ता येथील आर.जी.कर. मेडिकल कॉलेजमध्ये,घडलेल्या घटनेत एका महिला डॉक्टरवर क्रूरपणे बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. या अत्यंत नींदनीय व लंछनास्पद घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठा धक्का बसला आहे व तसेच मध्यरात्री १५ ऑगस्ट रोजी आंदोलन विद्यार्थ्यांवर हल्ला करण्यात आला त्याच्या Central MARD या निवासी डॉक्टर संघटनेनी पुकारलेल्या संपामध्ये जे.जे. हॉस्पिटल मधील तृतीय श्रेणी संघटनेचा जाहीर पाठिंबा व्यक्त करण्यात आला. पाठिंबा पत्र जे.जे. हॉस्पिटल मार्ड संघटनेचे अध्यक्ष डॉ. संपत सूर्यवंशी, व मध्यवर्ती मार्ड संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रतीक देबाजे, महासचिव डॉ. आदिती कानडे, उपाध्यक्ष डॉ. अक्षय नलावडे, डॉ. प्रणय खेडकर, डॉ. अक्षय बोडके, व डॉ. दस्तागीर जमादार हे सर्व मार्ड संघटनेच्या पदाधिकारी यांच्याकडे तृतीय श्रेणी संघटनेचे अध्यक्ष सुरेश तांबे व सरचिटणीस अरुण जाधव यांनी दिले. याबद्दल मार्ड संघटनेचे पदधिकारी यांनी आभार मानले.



## पवईमध्ये जोरदार निदर्शने

# 24 ऑगस्टचा 'महाराष्ट्र बंद' यशस्वी करण्याचे माकपचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रातील महिला आणि बालिकांवर होत असलेल्या वाढत्या अत्याचारांच्या विरोधात महाविकास आघाडीने शनिवार, २४ ऑगस्ट रोजी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिली आहे. राज्यातील जनतेने हा बंद शंभर टक्के यशस्वी करावा, असे आवाहन भारताचा कम्युनिस्ट पक्षाने (मार्क्सवादी)केला आहे.

बदलापूर, पुणे, अकोला आदी ठिकाणी शाळांमधील लहानग्या विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचाराच्या मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना घडल्या आहेत. बदलापूर येथील घटना घडलेल्या शाळेचे संचालक रास्व संघ/भाजपचे असल्याने महायुतीच्या नेत्यांनी पोलिसांवर दबाव आणला. त्यामुळे पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेण्यास अक्षम्य टाळाटाळ केली. याविरुद्ध असंतोष व्यक्त करणाऱ्या जनतेवर अमानुष लाठीमार केला. बदलापूरचे माजी नगराध्यक्ष, एकनाथ शिंदे गटाचे वामन म्हात्रे यांनी एका महिला पत्रकाराशी बोलताना अतिशय अश्लाघ्य भाषा वापरली आहे.

महायुतीने मुळातच गुन्हेगारीतून राज्याची सत्ता ताब्यात घेतली आहे. महाराष्ट्र ही सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची राजधानी बनवत या महायुतीने आजवर सुसंस्कृत, महिला आणि सर्वसामान्यांचा आदर करणारे राज्य ही महाराष्ट्राची प्रतिमा मातीत घातली आहे.

बेटी बचाव, लाडकी बहीण या घोषणांमागील हे वास्तव आहे. राज्यातील महिलांना खरी गरज महायुती पोसत असलेल्या गुंडांपासून संरक्षणाची आहे. यापूर्वी ठाणे जिल्ह्यातीलच कल्याण येथील गणेश घोळ मंदिरात सासरच्या छळाला कंटाळून थोडा मानसिक आधार घेण्यासाठी आलेल्या अंकिता म्हात्रेवर तीन पुजाऱ्यांनी बलात्कार करून तिचा खून केला होता. रायगडची यशश्री शिंदे, श्रद्धा भोईर......यादी न संपणारी आहे.

महायुती सरकारच्या महिलाविरोधी कारभाराचा निषेध करण्यासाठी पुकारण्यात आलेला महाराष्ट्र बंद पूर्णतः यशस्वी करण्यासाठी माकपच्या कार्यकर्त्यांनी त्वरित कामाला लागावे. जनतेनेही या बंदमध्ये सहभागी व्हावे.असे आवाहन ही डॉ. नारकर यांनी केले आहे.

पवई येथील (मार्क्सवादी) कम्युनिस्ट पक्षाच्या शाखेच्या वतीने महिलांवर अत्याचाराच्या विरोधात निदर्शन करण्यात आली.या आंदोलनात एसएफआय, डिवायएफआय आणि जनवादी महिला संघटना आणि कामगार संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संखेने सहभागी झाले या आंदोलनाचे नेतृत्व शैलेंद्र चौहान, संगीता सोनवणे, तबरेज अली आदींनी केले.



*मुंबई:माजी प्रधानमंत्री स्वर्गीय भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त माटुंगा येथील षण्मुखानंद हॉल येथे सद्भावना दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे , खासदार वर्षा गायकवाड, संदीप शुक्ला, सुरेशचंद्र राजहंस आणि इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते*


## नवी मुंबई महानगरपालिका

अभियांत्रिकी विभाग

**निविदा सुचना क्रमांक - नमुंमपा/शहर अभियंता / 89 / 2024-25**

**कामाचे नाव :-** बेलापुर विभागातील रतन आयकॉन सो.ते होंडा शोरुम से.50 नवीन नेरूळ येथील अंतर्गत रस्त्याच्या बाजुस असलेले फुटपाथ स्टॅम्प कॉंक्रिट करणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 64,41,658/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.22/08/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/251/2024



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. ११/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक ३१/०७/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक एक्टिव टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, **दैनिक वृत्तमानस,** मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / **महामंडळाचा खुलास व ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | बदलापूर औद्योगिक क्षेत्र... बदलापूर कलेक्शन संप ते अंबरनाथ आरओबी **येथील कलेक्शन संप पर्यंत** ८०० मि.मी. व्यासाची एचडीपीई सांडपाणी निःसारण वाहिनीचा पुरवठा करणे, जोडणे व कार्यान्वित करणे. तसेच **इलेक्ट्रोमेकॅनिकल कामांसह विद्यमान कलेक्शन संप,** पंप हाऊस इत्यादींची पुनर्बांधणी करणे. | ₹१२८,८३,५३,०४६.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०४/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक २६/०८/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २९/०८/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा कार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जा.क्र./का.अ.(मुख्या)/ P299218 /२०२४



## MAHAGENCO E-TENDER NOTICE

Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**Tender Specification No.** - C.E.Civil-III/ REC,Pune/ Construction of concrete approach along boundary wall of class IV colony at Panshet HPS, Tal Velhe, Dist. Pune and The work of construction of foundation and shed for DG set at Bhatghar HPS and Refurbishment & renovation work for staff quarters at Manikdoh HPS, Tal Junnar, Dist. Pune / Rfx No. 3000051234, 3000051235 & 3000051237/FY-2024-25.
The office of CE(C)-III, MSPGCL, and Prakashgad Mumbai is inviting tender from CE(C)-III /Construction of concrete approach along boundary wall of class IV colony at Panshet HPS, Tal Velhe, Dist. Pune and The work of construction of foundation and shed for DG set at Bhatghar HPS and Refurbishment & renovation work for staff quarters at Manikdoh HPS, Tal Junnar, Dist. Pune

| | |
|---|---|
| **Sale Start Date:** 22.08.2024 from 11.00 AM. | **Sale Closed Date:** 11.09.2024 up to 15.00 PM. |
| **Submission Date :** 11.09.2024 up to 17.00 PM | **Tender Purchase Cost:** Rs. 2,360/- |

Kindly see the company's website **https://eprocurement.mahagenco.in**. For detailed tender notice.

**Contact** Superintending Engineer (C), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai. **Fax :**( 022)26581469 **Tel.No.** 022-26474211 extn. 2590, 26472131



## मध्य रेल्वे

**यूआयसी टॅपर बेअरिंगची खरेदी**

उप मुख्य साहित्य व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय, माटुंगा, मुंबई – ४०००१९ निविदा क्र. : ८५२४२००३ मागवित आहेत. बाब वर्णन : एसकेएफ आरे. क्र. १६३९३३ बीसी किंवा टिमकेन आरे. क्र. ई ४८९९९ [एच १२७७४६ एच-९००१०] किंवा फियॅट स्पष्टीकरण क्र. १७.५६५ १०० ०१ आणि १७.५६५.१०३ ०० (आरडीएसओद्वारे तात्पुरत्या स्त्रोताद्वारे निश्चित) सोबत निश्चित केलेले किंवा आरडीएसओ स्पष्टीकरण क्र. आरडीएसओ/२०१४/सीजी-०२ फेरफार १/ फेब २०१८ (आरडीएसओ मान्यताप्राप्त स्त्रोत) अनुसार फियॅट बोगीसाठी १३० मिमी व्यासाच्या ॲक्सल जर्नलकरीता यूआयसी टॅपर रोलर बेअरिंग. सदर बाब केवळ आरडीएसओ मान्यताप्राप्त स्त्रोताकडून खरेदी करण्यसाठी मर्यादित आहे. परिमाण: १०० नग उघडण्यासाठी देय दिनांक: १६ सप्टेंबर २०२४. निविदा मूल्य: रु. ३४,०९,१३६/- निविदेचा पूर्ण तपशिल मध्य रेल्वे संकेतस्थळ www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. पूर्ण कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील.

निविदा सूचना क्र. सीडब्ल्यूई/एमटीएन/८५२४२००३/२०२४

344

**अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है**



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण

**-जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ -२** मधील 'जी / उत्तर' विभागातील **०१** प्रस्ताव म्हणजेच एकूण **०१** प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरी प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावामधील झाडे कापणे / पुनर्रापित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या www.mcgm.Gov.in संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ९६२ ( जी / उत्तर)

**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,**
पेंग्विन इमारत, २ रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email-sggardens@mcgm.gov.in

पीआरओ/१०१५/जाहि/२०२४-२५

सही/-
**उद्यान अधीक्षक**
**वृक्ष अधिकारी**

**गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.**



## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता [ पूर्व ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६ मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५२५१) हे जिल्हा उप निबंधक / पूर्व / मुंबई उपनगरे जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण **१६** कामाकरीता वी १ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक २३.०८.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक ३०.०८.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व), मुं.झो. सु. मंडळ यांनी राखून ठेवला आहे.


**सही/-**
**कार्यकारी अभियंता (पूर्व),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

CPRO/A/615

Follow us:@mhadaofficial

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

विचार करणे ही खरंच खूप कठीण गोष्ट आहे. कदाचित त्यामुळेच फार कमी लोक तो करतात.



- हेन्री फोर्ड
अमेरिकन उद्योजक

वृत्तमानस
मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# पाणी नियोजनाचे नका वाजवू बारा

मुंबईसह ठाण्याला पाणीपुरवठा करणारी बहुतांश धरणे सध्या काठोकाठ भरून वर्षभराची पाण्याची चिंता मिटली असली तरी या दोन्ही शहरातील अनेक भागात आजही टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आलेली आहे. हा प्रश्न फक्त या दोन शहरापुरता मर्यादित नसून राज्यातील सुमारे ६५ टक्के भागात हीच अवस्था पाहावयास मिळत असल्याने आपल्या पाणी नियोजन यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. जुलै महिन्यात चांगला पाऊस पडल्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांत सध्या ९३ टक्के पाणीसाठा आहे. सर्व धरणांमध्ये सरासरी ९० टक्यांहून अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे. धरणांतील पाणीसाठा वाढताच पालिकेने पाणीकपात अधिकृतपणे मागे घेतली. मात्र, तरीही मुंबई सह ठाण्यातील काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. ठाण्यातील घोडबंदर रोड वर आजही अनेक हायरेज सोसायटी टँकरच्या पाण्यावर अनेक वर्षे सुरू असून त्यात कसलाही बदल झालेला नाही. जुलैमध्ये झालेली पावसाची कमाल पातळीने धरणे भरली तरी पिकांचे मात्र अतोनात नुकसान झाले आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे भीमा आणि कृष्णा खोऱ्यातील धरणे तुडुंब भरलेली असतानाही पश्चिम महाराष्ट्रातील तब्बल एक लाख ६७ हजार नागरिक अद्यापही तहानलेलेच आहे. या नागरिकांना ६९ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. गेल्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने काही तालुक्यांमध्ये सुरू झालेले टँकर अद्याप सुरू असल्याचे समोर येत आहे. यंदा मोसमी पाऊस सक्रिय झाल्यानंतर जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे भीमा आणि कृष्णा खोऱ्यातील बहुतांश धरणे भरली आहेत. सर्वदूर पाऊस झाल्याने पुढील पावसाळ्यापर्यंत पाण्याची चिंता मिटली असल्याचे चित्र आहे. मात्र, प्रत्यक्षात अद्यापही पुणे जिल्ह्यातील एक गाव, साताऱ्यातील दहा, सांगलीतील ३६ आणि सोलापूर जिल्ह्यातील सहा गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वार्थाने सधन अशी ओळख असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात गेल्या वर्षी पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे तीव्र उन्हाच्या झळांमुळे अनेक ठिकाणी पिके वाळली होती. सिंचनाची सोय असलेल्या भागातही पाण्याअभावी पिकांनी मान टाकली होती. परिणामी चारा उपलब्धतेवर देखील परिणाम झाला होता. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर वगळता इतर चारही जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाईची झळ बसली होती. विहिरींनी तळ गाठल्याने पाऊस कमी झालेल्या तालुक्यांत जनावरांच्या चारा-पाण्याची टंचाई जाणवत होती. या पाणीटंचाईतून जनावरे देखील सुटलेली नाहीत. साधारण पणे जुलै महिन्यात दरवर्षी भरपूर पाऊस पडतो. पूर येतो. धरणे भरतात. तरीही डिसेंबर जवळ येताच पाण्याची टंचाई सुरू होते. काही गावात तर पावसाळा सुरू असतानाच पाण्याची टंचाई सुरू होते. गावोगावी पाण्यासाठी लोकांचे हाल कसे होतात याच्या बातम्या वाहिन्यावर दाखवल्या जातात. पावसाळ्यात पूराच्या आणि हिवाळा-उन्हाळ्यात पाणी टंचाईच्या बातम्या, हे का घडते, कसे घडते, याचा आपण साकल्याने विचार करण्याची गरज आहे. एकीकडे धरणे काठोकाठ भरल्याचा जेवढा आनंद असतो तेवढाच त्या उपलब्ध पाण्याचे समान वितरण आणि नियोजन हा मुद्दा कोणी फारसा गांभीर्याने घेत नाही. पाण्याचा अमर्याद वापर आणि नासाडी करण्यात आपणच पुढे असतो. याचा परिणाम मग दिवाळी नंतर साधारणपणे डिसेंबर पासून दिसू लागतो. वाढत्या मागणीने धरणे रिकामी होण्यास सुरुवात होताच पाणी कपातीचे अस्त्र उगारले जाते. जगभरात सरासरी पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणापेक्षा दोन इंच जास्त म्हणजेच ४३ इंच पाऊस भारतात पडतो. भारताच्या सरासरीपेक्षा पाच इंच जास्त पाऊस महाराष्ट्रात पडतो. आमची धरणे काठोकाठ भरतात. उलटून वाहू लागतात. तरीही उन्हाळ्यात पाण्याची टंचाई निर्माण होते. याचे पहिले कारण म्हणजे आपण महाराष्ट्रात पावसाचे पुरेसे पाणी साठवू शकेल अशी व्यवस्था अद्याप निर्माण करू शकलो नाही. नद्यांच्या प्रवाहातून वाहत जाऊन प्रवाहातून १०० लिटर पाण्यापैकी ६७ लिटर पाणी समुद्राला मिळते. हे समुद्राला मिळणारे पाणी अडवायला पाहिजे आणि ते पाणी जमिनीत जिरवायला पाहिजे. जागतिक तापमान वाढीने बाष्पीभवनाचा वेग दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यातही धरणाचे पात्र मोठे असेल आणि खोली कमी असेल तर हा वेग आणखी वाढत आहे. त्यामुळेही पाण्याच्या बाष्पीभवनामध्ये मोठी वाढ झाल्याने मोठ्या प्रमाणात पाणी कमी होत आहे. यावर तोडगा काढणे कोणा एका देशाला शक्य नाही. त्यासाठी सर्वच देशांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणे आवश्यक आहे. मात्र हव्या त्या वेगाने याबाबत सकारात्मक प्रयत्न होत नसल्याने यावर आपण आपले प्रयत्न करत राहणे, एवढेच राहते. पूर्ण क्षमतेने भरलेली धरणे उन्हाळ्यात कोरडी पडण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. हे कारण अनेकांच्या लक्षात आले आहे. मात्र ही समस्या दूर करण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. राज्यातील अनेक धरणे गाळाने भरली गेली आहेत. त्यामुळे धरणांचे पात्र उथळ झाले आहे. त्यामुळे धरणाच्या एकूण साठवण क्षमतेइतके पाणी साठतच नाही. मधल्या काळात या धरणांमधील गाळ काढण्याचे काम करण्यात आले असले तरी ते किती यशस्वी झाले याची माहिती मिळत नाही. पावसाळ्यात धरणाचे दरवाजे उघडले गेले की आपण खूश होतो. मात्र जेवढे साठणे अपेक्षित असते, तितके पाणी साठतच नाही. तरीही तलावाची सुरुवातीची साठवण क्षमता गृहित धरून सर्व आकडेवारी जाहीर करण्यात येते. त्यामुळे उपयुक्त पाणीसाठा आजही तेवढाच मिळत असला तरी मृत पाणीसाठा वेगाने घटत आहे. त्यामुळे आजूबाजूच्या भूगर्भातील पाणी पातळी झपाट्याने खाली होत असल्याचे लक्षात येते. आपण तलावात जे काही पाणी साठवत असतो, त्या पाण्याचा स्वतःचा जमिनीवर दाब निर्माण होत असतो. या दाबामुळे खालच्या भागात असणारे पाणी भूगर्भात निर्माण झालेल्या पोकळीकडे पूर्वीपेक्षा जास्त वेगाने धावत असते. धरण क्षेत्रात असे पाणी पाझरून आजूबाजूच्या पोकळीत जात असल्याने धरणातील पाण्याचे प्रमाण घटत असते. भूगर्भातील पाणी आपण जितके जास्त वेगाने उपसत जाऊ, तितक्याच वेगाने त्याची जागा घेण्यासाठी पाणी जमिनीत धावते. यामुळे धरणातील पाण्यात घट होते. हे असे पाण्याचे मुरणे किती आहे, याची मोजदाद करता येणे शक्य नसल्याने यावर आज कोणीही फारसे बोलताना दिसून येत नाही. मात्र भूगर्भातील घटते पाणी, हे दुर्लक्षित राहिलेले महत्त्वाचे कारण बनत आहे. तलावांच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शहरांचा वाढत असणारा विस्तार आणि स्थानिक स्वराज्य संस्थाचे बेफिकीर होणे हे आहे. कोणत्याही तलावातून शहराला होत असणारा पाणी पुरवठा दिवसेंदिवस वाढत आहे. शहराची लोकसंख्या, शहरातील घरे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाला पुरेसे पाणी पुरवणे आवश्यक असले तरी स्थानिक स्वराज्य संस्था प्रति माणसी प्रति दिन किती पाणी पुरवले जाते, याचेही भान राखणे आवश्यक आहे. मात्र हे प्रमाण खूपच वाढले आहे. मात्र वाढती लोकसंख्या आणि पाणी पुरवठ्याचे अतिरेकी प्रमाण हे तलावातून अतिरिक्त पाणी उपसण्यास कारणीभूत ठरत आहे. यावर उपाय जनतेनेच करण्याची गरज आहे. आपण जबाबदारीने पाणी वापरण्याची गरज आहे.

# 'वस्त्रहरण'... आदर्शांचे आणि संस्कृतीचे

महाभारत हे महाकाव्य भारतीय हिंदू संस्कृतीची एक वेगळी ओळख आहे. महाभारतातील युद्धात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेल्या दिव्य उपदेशातून श्रीमद्भवदगीता नामक ग्रंथाचा उगम झाला. हजारो वर्षानंतर आजही हिंदूंसाठी गीता परमवंदनीय आहे. धर्म आणि अधर्माचा लढा म्हणजे महाभारत, असत्यावर सत्याने मिळवलेला विजय म्हणजे महाभारत. जीवनात कसे वागावे कसे वागू नये, कोणाची संगत करावी कोणाची करू नये, कोणत्या प्रसंगात कोणते निर्णय घ्यावेत, भगवंताच्या अधिष्ठानाचे महत्व आदी गोष्टी महाभारतातून शिकायला मिळतात. महाभारतातील प्रत्येक व्यक्तिरेखेचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. त्या प्रत्येक व्यक्तिरेखेने जनमानसांत एक वलय निर्माण केले आहे जे आजही अबाधित आहे. सर्वश्रेष्ठ प्रतिज्ञा आजही भीष्मप्रतीज्ञा म्हणून ओळखली जाते. श्रेष्ठ धनुर्धारी म्हणून आजही अर्जुनाचे नाव घेतले जाते. क्रीडाक्षेत्रातील प्रावीण्याबद्दल दरवर्षी भारत सरकारच्या वतीने अर्जुन पुरस्कार दिला जातो. महाबली हनुमानानंतर बलशाली म्हणून नाव घेतले जाते ते भीमाचे. भारतीय संस्कृतीतील पाच पातिव्रतांमध्ये द्रौपदीचे नाव आजही आदराने घेतले जाते. सत्यवचनी म्हणून धर्मराज युधिष्ठिरांनी आपले नाव अजरामर केले आहे. अशा एकनाअनेक आदर्श पात्रातून निर्माण झालेले महाभारत माता जिजाऊंच्या मुखातून ऐकूनच छत्रपती शिवाजी महाराज लहानाचे मोठे झाले. ज्यांनी शून्यातून स्वराज्याची निर्मिती केली. अशा हिंदू धर्मातील आदर्शवत आणि पवित्र ग्रंथातील व्यक्तिरेखांना विनोदी स्वरूपात दाखवून त्यावर थुकरट विनोद निर्माण करणारे एक नाटक पुन्हा एकदा रंगभूमीवर झळकले असून नाट्यरसिकांकडून या नाटकाला उदंड प्रतिसादही मिळत आहे.

कोकणामध्ये स्थानिक कलावंत दशावतारांवर आधारित नमन आणि दशावतार सादर करतात. लग्न असो वा महापूजा संध्याकाळी नमन किंवा दशावताराचा कार्यक्रम हा ठरलेला असतो . या कार्यक्रमांतून सादर करण्यात येणारी कथा आणि संगीत सारखेच असले तरी ते पाहण्यासाठी प्रत्येक ठिकाणी शेकडोंच्या जनसमुदाय गोळा होतो. असाच एक दशावतार सादर करणाऱ्या मंडळींच्या पडद्यामागील घडामोडी आणि लोकांसमोर ते सादर करताना झालेली फजिती दाखवणारे गंगाराम गवाणकर लिखित कै. रमेश रणदिवे दिग्दर्शित सं'गीत वस्त्रहरण' हे नाटक पुन्हा एकदा रंगमंचावर आले आहे. महाभारतातील आदर्शवत व्यक्तिरेखांवर या नाटकातून केलेले थुकरट विनोद पाहिल्यावर कोणत्याही हिंदू धर्मप्रेमींची तळपायाची आग मस्तकात गेल्यावाचून राहणार नाही. यातील अर्जुनाची भूमिका करणारे पात्र संपूर्ण नाटकात दारू पिऊन तर्र झालेल्या अवस्थेत दाखवण्यात आले आहे. मद्यधुंद अवस्थेत हे पात्र चित्रविचित्र चाळे करताना दाखवले आहे. हे पात्र नाटकातील भीमाचे पात्र करणाऱ्याला लाथ मारताना, रंगमंचावर ठुमके देत येताना आणि दारूच्या नशेत रंगमंचावर कोसळताना दाखवण्यात आले आहे. महाभारतातील विदुराची कृष्णभक्ती सर्वांनाच ज्ञात आहे. स्वतः पितामह भीष्मसुद्धा विदुराचा सल्ला घेत; मात्र या नाटकात विदुराला विडी ओढताना आणि तमाशातील महिलेसोबत नृत्य करताना दाखवण्यात आले आहे. महापराक्रमी भीष्मांची महाभारतात 'पितामह' म्हणून वेगळी ओळख आहे. भगवान श्रीकृष्णही भीष्मांचा आदर करत. अशा पितामह भीष्मांची भूमिका करणाऱ्या पात्राला भीष्मांच्या वेशभूषेत 'बीलनची नागीण निघाली' या गाण्यावर रंगमंचावर अचकट विचकट चाळे करत नाचताना दाखवण्यात आले आहे. कुत्र्याला बोलावतात तशा प्रकारे या नाटकातील विदुर धर्मराज युधिष्ठिराला बोलावताना दाखवला आहे. यातील शकुनीमामा युधिष्ठिराला 'तुझ्या आयशीचा घो' म्हणत हिणवताना दाखवला आहे. पतिव्रता म्हणून ओळख असलेल्या ज्या द्रौपदीच्या वस्त्रहरणावरून संपूर्ण महाभारताचे महायुद्ध घडले ती द्रौपदी या नाटकात अर्वाच्च भाषेत भांडताना दाखवण्यात आली आहे. आपल्या साडीचा पदर स्वतःहून कौरवांच्या आणि पांडवांच्या हाती देऊन आपले वस्त्रहरण करण्यास सांगताना दाखवली आहे. यामध्ये इंद्रदेवांचा उल्लेख 'कामाठापुराचा देव' असा करण्यात आला आहे. 'वसाडया', 'तुझ्या आयशीचा घो' यांसारख्या शिव्या तर पांडवांच्या तोंडी वेळोवेळी दाखवण्यात आल्या आहेत. इंद्राची भूमिका करणाऱ्या पात्राच्या अंगात देव येतो आणि तो बाईचे नृत्य बघण्याची मागणी करताना यामध्ये दाखवण्यात आले आहे. नाटकातील सरपंचाच्या झोपण्याला 'सार्वजनिक गणपती झोपला' असे उल्लेखण्यात आले. विनोदाच्या नावावर असे एकनाअनेक प्रसंग या नाटकातून सादर करण्यात आले आहेत.

अभिव्यक्ती आणि लोककला सादर करण्याचे स्वातंत्र्य भारतीय घटनेने बहाल केले असले, तरी त्यातून कोणाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी ते सादर करणाऱ्याने घ्यायला नको का ? महाभारतातील व्यक्तिरेखा या हिंदू धर्मीयांसाठी नेहमीच आदर्शवत राहिल्या आहेत त्यामुळे त्यांचा विनोदासाठी अत्यंत विकृतपणे वापर करणे निषेधार्हच आहे. नाटक, स्टँडअप कॉमेडी, चित्रपट यांतून विनोद सादर करायचा तर त्यासाठी पुराणातील, इतिहासातील पात्रे, साधूंच्या व्यक्तिरेखा घेण्याचे फॅड मध्यंतरी निर्माण झाले होते. काही जागृत हिंदू आणि धर्मप्रेमी संघटना यांनी वेळोवेळी केलेल्या विरोधामुळे या गोष्टीना आता आळा बसू लागला आहे. 'संगीत वस्त्रहरण' या नाटकातून पुन्हा विनोदाच्या नावावर महाभारतातील आदर्श पात्रांचा अवमान करण्यात आला आहे. त्यामुळे या नाटकाच्या सादरीकरणावर अंकुश घालण्याची मागणी हिंदू जनजागृती समिती आणि अन्य हिंदुत्वनिष्ठ संघटनांकडून करण्यात येत आहे. लोककलेच्या नावाखाली विनोदनिर्मितीसाठी आदर्श व्यक्तिरेखांना पायदळी तुडवण्याचा प्रघात एकदा पडला कि भविष्यात भगवान श्रीराम, श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या आदर्श व्यक्तिरेखांवरही सर्रासपणे थुकरट विनोद केले जातील. प्रतिदिन घडणाऱ्या घटनांवरून समाजातील अनैतिकता वाढू लागली आहे हे आपण पाहतच आहोत. विनोदाच्या नावाखाली आदर्श व्यक्तिरेखांवर चेष्टमस्करी होऊ लागली तर समाजाचे नैतिक अध:पतन होण्यास वेळ लागणार नाही. आदिपुरुष चित्रपटातील काही प्रसंग आणि व्यक्तिरेखा याबाबतचा वाद जेव्हा न्यायालयात गेला तेव्हा न्यायालयाने सुद्धा 'अभिव्यक्ती स्वातंत्र्यालाही मर्यादा असते' असे सांगत निर्मात्याला फटकारले होते. जाहिराती, नाटके, स्टॅन्ड अप कॉमेडी, चित्रपट आदी माध्यमांतून अभिव्यक्तीच्या नावाखाली हिंदू धर्म, धर्मग्रंथ, आदर्श व्यक्तिरेखा, संत, महापुरुष यांचे केले जाणारे विडंबन थांबावे यासाठी कायदा करण्याची मागणीही यानिमित्ताने हिंदुत्वनिष्ठ संघटनानी केली आहे. या सर्वांत आश्चर्य वाटते ते अशी नाटके पाहायला जाणाऱ्या प्रेक्षकांचे, आपल्या आईवडिलांवर कोणी थुकरट विनोद केले तर आपण ते सहन करू का ? मग आपल्या आदर्शांना अशा प्रकारे अचकट विचकट चाळे करताना पाहून आपण त्याकडे हसून दुर्लक्ष कसे काय करू शकतो ? विनोद निर्मितीसाठी पुराणातील पात्रे, साधूच का लागतात ? त्यांच्याशिवाय निखळ विनोद असू शकत नाही का ? मायबाप प्रेक्षक जोपर्यंत ही बाब नाट्य आणि चित्रपट निर्मिती करणाऱ्यांना योग्य प्रकारे समजावत नाहीत तोपर्यंत हे असेच चालू राहणार. त्यासाठी रसिक प्रेक्षकांनी पुढे यायला हवे !

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# मानवतेला काळीमा फासणारी घटना

कोलकात्यात एका डॉक्टर असलेल्या तरुण मुलीवर झालेल्या अत्याचाराने देशात संतापाची लाट उसळली असतानाच आपल्या महाराष्ट्रात त्याहून संतापजनक घटना घडली . बदलापूर शहरातील एका नामांकित शाळेत चार वर्षाच्या दोन मुलींवर शाळेतच अत्याचार झाला. मन सुन्न करणारी ही घटना समोर आल्यावर नागरिकांच्या संतापाचा कडेलोट झाला आणि यात दोषी असलेल्या नराधमाला फाशी द्यावी यासाठी नागरिक मैदानावर उतरून आंदोलन करू लागले. बदलापूरच्या घटनेने केवळ बदलापूर मध्येच नव्हे तर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. बदलापूरची घटना ही मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे.

मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेने राज्यात महिला तसेच मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थात महाराष्ट्रात घडलेली ही पहिली घृणास्पद घटना नाही मागील काही वर्षात तर अशा घटनांची मालिकाच सुरु आहे मागील वर्षीच पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची सुरक्षा राक्षकाने हत्या केल्याची बातमी आली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नाराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला होता. कोपर्डीची घटना तर अजूनही ताजीच आहे अर्थात वर उल्लेख केलेल्या घटना या फक्त प्रातिनिधिक आहेत अशा घटना आपल्या राज्यात दररोज घडत असतात. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना वाचायला मिळतेच. घटना घडून गेल्यावर शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. बदलापुरात बारा तासांनी पोलिसांनी गुन्हा नोंदवला पोलिसांनी इतक्या संवेदनशील प्रकरणात इतकी असंवेदनशीलता दाखवणे निषेधार्हच आहे अर्थात पोलिसांनी असे करावे यासाठी पोलिसांवर कोणाचा दबाव होता का ? याचीही चौकशी व्हायला हवी. यात शाळा प्रशासनाची देखील मोठी चूक आहे. शाळा प्रशासनाने हे प्रकरण दाबण्याचाच प्रयत्न केल्याचे वरकरणी दिसत आहे. दिवसाढवळ्या महिलांची, मुलींची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे.

दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला कालिमा फासणारे कृत्य करत आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### 'बदलापूर'च्या प्रकरणात जनक्षोभ उसळणारच होता...

दिल्ली निर्भया प्रकरणानंतरही महिलांवरील अत्याचाराची मालिका थांबलेली नाही हे कोलकाता डॉक्टर प्रकरण आणि त्यानंतर उत्तराखंड परिचारिका प्रकरण यामुळे स्पष्ट झाले. बदलापूर प्रकरणामुळे तर अत्याचाराची परिसीमाच गाठली गेली. एकापाठोपाठ एक घडलेल्या या घटनांमुळे जनक्षोभ न उसळता तर नवल. तसा तो काल बदलापूर येथे उसळला. महिला मग ती कुठल्याची वयाची असो त्या नराधमांच्या पापी नजरेतून सुटत नाही. मंदिरासारखे पवित्र ठिकाणही जिथे त्या नराधामांना कुकर्मापासून रोखू शकत नाही तिथे शाळेसारखी पवित्र वास्तूही हतबल ठरते. मुलगी शिकली प्रगती झाली असे आपण म्हणतो खरे पण डॉक्टर, परिचारिकांसारख्या सुशिक्षित महिला जेव्हा अत्याचारग्रस्त ठरतात तेव्हा त्या सुरक्षित असणे तितकेच महत्त्वाचे ठरते. बदलापूरच्या घटनेमुळे जनमानसात 'आरोपीला थेट यमसदनी धाडण्याची' मागणी होतेय कारण याअगोदरच्या प्रकरणातील आरोपी कायद्यातील पळवाटा शोधून सुटल्याचे ते विसरलेले नाहीत. त्यामुळे या प्रकरणातील आरोपीला जलदगतीने न्यायप्रक्रिया करुन कडक शिक्षा करावी.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### मलेशिया व जर्मनीमध्ये अनेकांना नोकरीच्या संधी मिळणार ...

सध्या महाराष्ट्र सरकारतर्फे जर्मनीमध्ये नोकरीच्या संधी मिळतायेत . ही एक चांगली घटना आहे . जर्मनीमध्येवाहन चालक शिवाय इतरही अनेक संधी उपलब्ध आहेत . आता भारत व मलेशिया या दोन देशांदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी व मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात दिल्ली येथे द्विपक्षीय चर्चा करण्यात आली . दोन्ही देशातिलेला संरक्षण, व्यापार, व गुंतवर्णूक आदी विषयावरील करारावर सह्या करण्यात आल्या . या मध्ये मलेशियामध्ये भारतीय युवकांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे या कराराचा सुद्धा समावेश आहे . भारतीय युवकाला मलेशियात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत जर्मनी व मलेशिया या दोन्ही देशात भारत सरकार तर्फे नोकरीच्या संधी उपलबध करून देण्यात येत आहेत ही समाधानाची बाब आहे आज अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आदी देशात अनेक तरुण भारतीय नोकरी करत आहेत अनेक जण उच्च शिक्षण घेत आहेत . सध्या भारतात नोकरीच्या संधी अतिशय कमी आहेत . ता दृष्टीने विदेशात नोकरी करणे योग्य ठरते . तथापि आपले टॅलेंट आपण योग्य रित्या वापरू शकत नाही ही एक खंत आहे . असो . आज केरळ या राज्याचे उदाहरण समोर आहे . तेथील अनेक युवक व युवती परदेशात विशेषतः आखाती देशात नोकरी करत आहेत . त्याचा फायदा केरळ राज्याला होत आहे सरकारने जर्मनी व मलेशिया या देशाबरोबर सरकारने नोकरीच्या संदर्भात जे प्रयत्न केले असेच प्रयत्न इतर देशाशी करावे अशी अपेक्षा आहे

**- शांताराम वाघ पुणे**

### मुलींवर अत्याचार ही घटना महाराष्ट्राला लांच्छनास्पद

बदलापूरच्या शाळेत आठ दिवसापूर्वी दोन लहान मुलींवर शाळेत शिपाई असलेल्या नराधमाने अत्याचार केला. मुलीने पालकाना ही घटना सांगितली असता पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी गेलेले असताना दखल घेण्यास दिरंगाई करुन उशीरापर्यत थांबवुन तक्रार नोंद केली. आठ दिवस झाले तरी शिंदे या नराधमावर कारवाई केली नसल्याने पालकवर्ग संतप्त झाला. एकत्र येऊन पालकांनी वाचा फोडली. बदलापूर रेल्वे स्थानकावर चक्का जाम केला. तेव्हा कुठे प्रशासनाला जाग आली. रेल्वे सकाळी ६ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यत बंद होती. प्रशुब्ध जमावाने एस टी बसची तोडफोड केली. रेल्वे पोलीस हजर झाले. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका, दोन शिक्षक , बदलापूर वरिष्ठ पोलीस निरिक्षक व दोन सहाय्यक निरिक्षक यांना निलंबित केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मॅसेज पाठवला व कठोर कारवाईचे आदेश दिले. पालकांनी शाळेच्या आवारात ठिय्या आंदोलन केले. आंदोलकांनी मंत्र्यांचे राजीनामा मागितले. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, शिक्षणमंत्री केसरकर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी यावे अशी मागणी केली. घटनेचा उभ्या महाराष्ट्रातल्या जनतेने तीव्र निषेध व्यक्त केला. सदर घटना महाराष्ट्राला काळीमा फासणारी लाच्छनास्पद असुन दिरंगाई न करता कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. सदर चौकशी व कारवाई यासाठी ॲड.उज्वल निकम यांची नियुक्ती केली असल्याचे घोषणा करण्यात आली आहे.सर्व स्तरातुन घटनेचा निषेध करण्यात आला आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर.अंधेरी**

### लोकप्रतिनिधी म्हणून तुमची कीव येते

संपूर्ण देशाला हादरवून सोडणारी दुर्दैवी घटना आदर्श विद्यालय बदलापूर येथे दोन शाळकरी लहान चिमुकल्या विद्यार्थी बाबत घडलेल्या कृत्याचा संपूर्ण देशातून जाहीर निषेध होतो आहे. घाणेरडे कृत्य करणाऱ्या नराधमाला फाशी ची शिक्षा झालीच पाहिजे या तीव्र मागणी साठी फक्त बदलापूरच नाही तर सगळी कडून लोकं या आंदोलनात सहभागी झाली होती. जो पर्यंत नराधमा ला शिक्षा होत नाही तोपर्यंत आम्ही इथून जाणार नाही असा पवित्रा आंदोलन कर्त्यांनी घेतला होता. लोकशाही चा चौथा आधार स्तंभ असलेल्या एका चॅनेल च्या वतीने संबंधित बातमी चे वृतांकन करणाऱ्या महिलेला " तु बातमी अशी देतेस , जणू तूझ्या वरच बलात्कार झालाय असे शब्द उदगारणारे बदलापूर चे लोकप्रतिनिधी बदलापूर शहराचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांना यापुढे लोकप्रतिनिधी म्हणायची तमाम बदलापूर करांना नक्कीच कीव येईल. लोकप्रतिनिधी म्हणजे काय असतात, त्यांची नैतिक जवाबदारी काय असते याचे जराही भान न ठेवता भरसटल्या सारखे वागणाऱ्या वामन म्हात्रे यांचा तमाम नागरिकांच्या वतीने जाहीर निषेध.

**- नितीन कदम दादर मुंबई** ■

## पनवेलमध्ये गुटख्याने भरलेला टेम्पो जप्त

**पनवेल :** पनवेल शहर पोलिसांनी जेएनपीटी ते पनवेल महामार्गालगत साईकृपा ढाब्याजवळ मागील ४-५ दिवसांपासून बेवारसरित्या उभ्या असलेल्या टेम्पोमधून तब्बल ४.३५ लाख रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आणि सुगंधीत तंबाखुचा साठा जप्त केला आहे. पोलिसांनी सदरचा गुटखा टेम्पोसह जप्त करुन टेम्पोच्या मुळ मालकाचा शोध सुरु केला आहे. गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्रात विक्री तसेच खाण्यास बंदी असलेल्या गुटख्याची विक्री चोरट्या पद्धतीने होत असल्याने याबाबतच्या अनेक तक्रारी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. त्यानुसार त्यांच्या आदेशाने प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत अशा प्रकारे विक्री तसेच साठा करणार्या गुटखा माफीयांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. गुटख्याचा साठा असलेला टेम्पो पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जेएनपीटी-पनवेल महामार्गालगत सर्व्हीस रोडवर असलेल्या साईकृपा ढाब्याजवळ उभा असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार या पथकाने सदर ठिकाणी तो टेम्पो ताब्यात घेतला असता त्यात तब्बल ४.३५ लाख रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आणि सुगंधीत तंबाखूचा साठा आढळून आला.



# सीएसएमटी लोकलचं दिवेकरांचं स्वप्न सत्यात उतरणार की 'दिवास्वप्न' ठरणार ?

- ●16 ऑगस्टपासून अमोल केंद्रेंचं उपोषण सुरुच
- ●50 संघटनांचा पाठींबा जाहीर



सुशांत पाटील
■ दिवा

लोकल ट्रेन हा सर्वांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. म्हणूनच ट्रेनला लाईफलाईन म्हटलं जात ते खरच आहे. ठाणे आणि डोंबिवली स्थानकाच्यानंतर दिवा स्टेशन हे सर्वात गर्दीचे स्थानक आहे. दररोज लाखो नागरिक रेल्वेने प्रवास करतात. त्यामुळे रेल्वे प्रशासनास देखील मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ होतो. गेल्या अनेक वर्षांपासून दिवा येथून लोकल चालू करण्याची मागणी होत आहे. 3 वर्षांअगोदर ५ व्या आणि ६ व्या मर्गिकेचे काम पूर्ण झाल्यावर दिवा-सीएसएमटी लोकल चालू करण्याची घोषणा करण्यात आली होती. ही घोषणा होती की गाजर असा प्रश्न असं दबक्या आवाजात दिवेकर बोलताना दिसतायत.




दिवा स्थानकावरून सध्या दररोज एकूण ४७९ लोकल सेवा धावतात. ज्यात ४२६ धीम्या लोकल असून त्यातील २१७ डाऊन आणि २०९ अप धीम्या लोकल आहेत. तर, ५३ जलद लोकल असून २७ डाऊन आणि २६ अप आहेत. मात्र, दिव्यावरून सीएसएमटीकडे जाण्यासाठी स्वतंत्र लोकल सेवाच नाही. सध्याच्या घडीला दिवा शहर वाढत चाललय, लोकसंख्यासुद्धा वाढतेय. तसेच इथला मुख्य मुद्दा आहे अनधिकृत बांधकामसुध्दा वाढत चालली आहेत. सर्वसामान्य माणसाला परवडणारी घर घेण्याच दिवास्वप्न दिव्यातच येऊन पूर्ण होत. सध्याच्या घडीला दिव्याची लोकसंख्या आहे कागदी ५ लाख ६३ हजार पण सत्यपरिस्थितीमध्ये आहे ८ लाखाच्यावर आह. कदाचित हा आकडा जास्तही असू शकतो. परंतु या भागातील लोकसंख्या वाढली तरी पायाभूत सुविधा, रेल्वे सेवेत फारसा बदल झाला नाही. परिणामी, भरगच्च भरलेल्या लोकलच्या दरवाज्याला लटकून सामान्य दिवेकरांना प्रवास करावा लागतो.

सध्या पावसाळा सुरु असल्याने पावसामुळे ट्रेन वेळेवर येत नाहीत. सकाळच्या वेळी होणारी गर्दी खूप मोठी असते. त्यामुळे रेल्वे मध्य चढणे शक्य होत नाही. परिणामी नागरिकांच्या मनात रोष निर्माण होत आहे. असाच रोष २०१५ मध्ये निर्माण झाला आणि त्यातून हिंसक आंदोलन निर्माण झाले होते. त्यानंतर दिवा शहरात फास्ट दिवा जंक्शन दिवा जंक्शन लोकल थांबण्यासाठी सुरुवात झाली. दिवा येथून लोकल सुरु झाल्यास कळवा मुंब्रा येथील प्रवाशांनासुध्दा याचा फायदा होईल.

काही दिवसांपूर्वी दिवा स्थानकात प्रवाशांनी काळी फीत लावून, रेल्वे प्रशासनाचा निषेध केला. आता दिवा येथे थांबा मिळावा यासाठी अमोल केंद्रे यांनी दिवा स्थानकाबाहेर १६ ऑगस्टपासून उपोषणाला सुरुवात केली आहे. ते अजूनपर्यंत चालूच आहे. त्यांनी यासंदर्भात १६ ऑगस्ट रोजी उपोषण केल्यानंतर रेल्वे पोलीस आणि दिवा स्थानक व्यवस्थापन यांनी भेट घेतली. त्यानंतर कोणीही आले नाही. खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला. मात्र, त्यांनीही याकडे दुर्लक्ष केले आहे, असे उपोषणकर्ते अमोल केंद्रे यांनी सांगितले.

### दिव्यात कही खुशी कही गम

दिवा-सीएसएमटी लोकल सुरु होण्यासाठी समाजसेवक अमोल केंद्रे यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. आजचा पाचवा दिवस आहे. त्याच येथील स्थानिक शिवसेनेचे माजी नगरसेवक शैलेश पाटील यांचा वाढदिवस २० ऑगस्ट रोजी मोठ्या दणक्यात साजरा करण्यात आला. गेले आठवडाभरापासून संपूर्ण दिव्यात त्यांच्या वाढदिवसाचे बॅनर झळकत होते. त्यामुळे एकीकडे वाढदिवस आणि एकीकडे उपोषण. म्हणून कही खुशी,कही गम असच चित्र पहायला मिळालं.



मी सध्या इथे भर पावसात उपोषण करतोय. इथे कोणी अधिकारी इथे फिरकलासुध्दा नाही. पण जेव्हा दिवा-सीएसएमटी लोकल सुरु होईल. तेव्हा इथे याच दिव्यात सगळ्यांचे बॅनर लागलेले दिसतील. तेव्हा सगळे पुढे येतील. पण मला पाठिंबा देण्यासाठी कुठे पुढे येणार नाही. या येऊ घातलेल्या निवडणुकीत दिवा-सीएसएमटी लोकल गाजर दाखवून विधानसभा, ठाणे महापालिका निवडणुकीत मत आपल्या पदरात पाडून घेण्याच काम नक्की होईल. दिवा-सीएसएमटी लोकल कधी चालू होईल. परमेश्वरालाच ठाऊक. मी सामान्य दिवेकरांसाठी दिवा-सीएसएमटी लोकल लवकरात लवकर चालू व्हावी.

- अमोल केंद्रे, उपोषणकर्ते समाजसेवक

## शाळेतील तीन मुलींची परप्रांतियांकडून छेड

### लोकांमध्ये संतापाचे वातावरण , गावकऱ्यांकडून चोप

प्रतिनिधी
■ पेण

बदलापूर येथे शाळेतील मुलींवरील अत्याचाराची घटना नुकतीच घडली असताना असाच प्रकार पेण तालुक्यातील एका शाळेत घडल्याचे समोर आले आहे. या ठिकाणी २ परप्रातीय तरणांकडून छेडछाडीची घटना घडल्याने या ठिकाणी लोकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पेण तालुक्यातील एका गावात तीन शालेय अल्पवयीन मुलींची छेडछाड काढल्याचा प्रकार समोर आला आहे. हा प्रकार गावात समजताच घटनास्थळी महिला जमा झाल्या. यावेळी तिथे असणाऱ्या दोन परप्रांतीयांना गावातील महिलांनी बेदम चोप देऊन डांबून ठेवले. ही गोष्ट दादर सागरी पोलीस यांना कळल्यावर त्वरित पोलिस घटनास्थळी हजर झाले. तेथील दोन्ही परप्रांतीय संशयितांना पोलिसांनी अटक केली.

राज्यात अनेक ठिकाणी अल्पवयीन मुलींची छेडछाड प्रकरणे सुरू समोर येत आहेत. असे असताना 20 ऑगस्ट रोजी दुपारी 2 वाजण्याच्या दरम्यान दादर तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात फिर्यादीची मुलगी व तिच्या सोबत शाळेत शिकणाऱ्या अन्य दोन अल्पवयीन मुलींची परप्रांतीय संशयित अखिलेश शामजी सैनी (वय 20 वर्षे) व मुनुकुमार त्रिभुवन चौहान (वय 22 वर्षे) दोघेही सध्या राहणार जिते, ता. पेण व मुळ राहणार धंधरा, पो. लक्ष्मीनगर, ता. तुळशीपूर, जि. बलरामपूर- उत्तरप्रदेश यांनी त्यांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने मोबाईल व चॉकलेट दाखवून बोलावले व इशारा करून अश्लील हावभाव करत छेडछाड केली. सदर प्रकार अल्पवयीन मुलींच्या नातेवाईकांना, गावकऱ्यांना व गावातील महिलांना समजताच त्यांनी दोन्ही परप्रांतीय संशयीतांना पकडून तूयांना बेदम चोप देत डांबून ठेवले. ही घटना दादर सागरी पोलिसांना समजताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता पोलीस घटनास्थळी पोहचले. त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला.

## बदलापूर आंदोलनकर्त्यांचे खटले मोफत लढवण्यासाठी वकिलांची टीम सज्ज

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

बदलापुरातील एका नामांकित शाळेसमोरील आंदोलनकर्त्यांचे खटले मोफत लढविण्यासाठी उल्हासनगरातील वकिलांची टीम सज्ज झाल्याची माहिती अँड कल्पेश माने यांनी दिली. आंदोलनकर्त्यांनी संपर्क साधण्याचे आवाहनही माने यांनी केले.

बदलापूरच्या एका शाळेतील चिमुकल्यावरील अत्याचाराच्या निषेधार्थ शाळेसमोर संतप्त नागरिकांनी आंदोलन करून, काही आंदोलकांनी शाळेच्या साहित्याची तोडफोड केली. याप्रकरणी काही आंदोलकांवर बदलापूर पोलिसांनी गुन्हे दाखल केले असून त्यावरील



खटले उल्हासनगर न्यायालयात चालणार आहे. या आंदोलनकर्त्यांची खटले मोफत चालविण्यासाठी वकिलांची टीम सज्ज झाल्याची माहिती अँड कल्पेश माने यांनी दिली. या वकील टीम मध्ये अँड उमेश केदार, अँड जय गायकवाड, अँड सत्येम पिल्ले, अँड राहुल बनकर, अँड प्रियेश जाधव आदी वकिलाचा सहभाग असणार असल्याची माहिती अँड माने यांनी दिली.

## पालिकामार्फत कचरा वेचकांच्या हातांना रोजगार देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विशेष रोजगार मेळावा

प्रतिनिधी
■ भाईंदर

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या संकल्पनेतून व स्वच्छ सर्वेक्षण 2024 अंतर्गत महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत 21 ऑगस्ट 2024 रोजी शहरातील कचरा वेचकांना रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून आयुक्त यांच्या उपस्थितीत मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

मिरा भाईंदर महापालिकेचे कार्यक्षेत्र 79 स्क्वेअर किलोमीटर इतके आहे. साधारण 14 लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरात 450 ते 500 मॅट्रिक टन कचरा रोज निर्माण होत आहे. मिरा भाईंदर महापालिकेच्या एकूण सहा प्रभाग समितीच्या दोन झोनमध्ये



विभागणी करून दैनंदिन साफसफाई करता कंत्राटी कर्मचारी आणि वाहनाद्वारे दररोज घरोघरी जाऊन ओला आणि सुका कचरा याचे वर्गीकरण करून उत्तन येथील प्रक्रिया प्रकल्पात तसेच बायोगॅस प्रकल्पामध्ये त्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. यासोबतच स्वच्छता निरीक्षक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार सध्या महानगरपालिका क्षेत्रात एकूण १३१ कचरा वेचक कार्यरत आहेत. हे कचरा वेचक वैयक्तिकरित्या प्लास्टिक कचरा गोळा करून स्थानिक विक्रेत्यांना अगदी कमी किमतीत विकत आहेत त्यामुळे त्यांच्या रोजच्या उपजीविकेचा प्रश्न शाश्वत बनणे खऱ्या अर्थाने कठीण झाले आहे. महापालिका आयुक्त यांनी ही बाब लक्षात घेत महानगरपालिकेचे कचरा वेचकांना समृद्ध आणि सक्षम करण्यासाठी एक विशेष रोजगार मेळावा नगर भवन येथे आयोजित केला होता. या मेळाव्याला मिरा-भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रातील कचरा वेचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. बिसलरी या कंपनीच्या सहकार्याने या कचरा वेचकांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना समृद्ध आणि सक्षम करण्यासाठी त्यांचे महापालिकेद्वारे बचत गट तयार करण्यात येणार असून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## मनसेच्या मध्यस्थीनंतर RTE प्रवेश प्रक्रिया निश्चिती झालेल्या विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

### 'मेस्टा'चे अध्यक्ष नरेश पवारांसोबत दिव्यातील मनसे पदाधिकारी आणि पालकांची संयुक्त बैठक

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

दिवा शहरातील RTE प्रवेश प्रक्रिया निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांना काही शाळांकडून मुदत उलटून गेल्यानंतरही प्रवेश देण्यात आले नव्हते. याबाबत दिवा मनसेने शिक्षण विभागाकडे आवाज उठवला होता. त्यानंतर आज मेस्टा संघटनेचे अध्यक्ष नरेश पवार यांच्या सोबत दिवा मनसे पदाधिकारी आणि पालकांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे होणारे संभाव्य नुकसान लक्षात घेवून त्यांना त्वरित



प्रवेश द्यावा अशी मागणी शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी केली. शाळांच्या शासनाकडून असलेल्या त्यांच्या न्याय मागण्यांबाबतच्या शाळांच्या लढ्यात दिवा मनसे नेहमी त्यांच्या सोबत उभी राहील, पण यात विद्यार्थ्यांचे नुकसान नको अशी भूमिका तुषार पाटील यांनी मांडली.

शाळा व्यवस्थापनांनीही याबाबत सहकार्याची भूमिका घेत उद्या पासून RTE च्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले. शाळांनी घेतलेल्या या भूमिकेचे स्वागत केले असून पालकांनीही याबाबत आनंद व्यक्त केला. यावेळी मनसे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे, मनविसे शहर अध्यक्ष कुशाल पाटील, शाखाध्यक्ष सागर निकम आणि पालकवर्ग बैठकीसाठी उपस्थित होते.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल काँग्रेसला प्रेम नाही- केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसभा निवडणुकीत दोनदा काँग्रेस पक्षाने पराभव केला होता. दिल्लीत 26 आलीपुर रोड येथे डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिले त्या घराचे काँग्रेस सरकारने स्मारक उभारले नाही. संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा लावली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न किताबही काँग्रेस सरकारने दिला नाही.

इंदुमिलची जमीन डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी काँग्रेस सरकारने दिली नाही. अशी अनेक उदाहरणे देवून काँग्रेसला



महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांबद्दल जराही प्रेम नाही असा आरोप रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केला. आज खारघर येथे भाजप आणि रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदे तर्फे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांचा तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री झाल्याबद्दल लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ना.रामदास आठवले बोलत होते. काँग्रेस ला नाही डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जाण आणि राहुल गांधी संसदेत का दाखवतात संविधान असा सवाल ना. रामदास आठवलेंनी केला.

## पंतप्रधानांनी 'आरक्षण' संविधानाच्या परिशिष्ट 9 मध्ये समाविष्ट करावे

### प्रजासत्ताक विद्यार्थी परिषदेची मागणी

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

आरक्षण, गरिबी निर्मूलनाचा नव्हे तर अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जात हिंदू आणि अनुसूचित जाती जमातीच्या नेत्या मध्ये झालेला करार आहे. त्यामुळे मोदी सरकारने संविधानात दुरुस्ती करून न्यायाची चळवळ सुरक्षित करावी. आणि आरक्षण हा विषय संविधानाच्या ९ व्या परिशिष्टात समाविष्ट करावा अशी मागणी प्रजासत्ताक विद्यार्थी परिषदेने केली आहे.

अनुसूचित जाती -जमातींना सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाचा आणि क्रिमीलेअर संदर्भात दिलेला निवाडा या विरोधात भारत भर असंतोष पसरला आहे.मोदी सरकारने या प्रकरणी संविधानात दुरुस्ती करण्यासाठी विशेष अधिवेशनाची मागणी देशातील आणि महाराष्ट्र राज्यातील अनेक संघटना करत आहेत. असेही मुंबई महानगर प्रदेशातील प्रजासत्ताक विद्यार्थी परिषदेच्या वतीने कोंकण विभागीय आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. संघटनेचे पदाधिकारी राजरत्न डोंगरगावकर, हर्ष कांबळे, प्रणित कांबळे,अक्षय कांबळे यांनी हे निवेदन सादर केले.

ओबीसी मध्ये उपवर्ग केल्यामुळे एक जात दुसऱ्या जातीच्या गटात समावेश करण्यासाठी लढत आहे. मराठा समाज ओबीसी च्या यादीत,धनगर समाज अनुसूचित जमातीच्या यादीत अशा अनेक जाती सध्या एकमेका विरोधात संघर्ष करत आहेत. जाती जातीमधील संघर्ष गतिमान करणारा हा निवाडा आहे . काही विशिष्ट जातींना टार्गेट करून त्यांना वगळण्यासाठी आखलेली नीती असल्याचे निवेदनात नमूद केले आहे .

## मोरबे धरण 93 टक्के भरले

■ नवी मुंबई

नवी मुंबई शहरापेक्षा यंदा मोरबे धरण परिसरात अधिक पाऊस झाला असून मोरबे धरण ९३ टक्के भरले आहे. तर यंदाच्या पावसाळ्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक पाऊस झाल्याने धरणाची पाणीपातळी झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे यंदाही धरण १०० टक्के भरण्याची आशा नवी मुंबईकरांना आहे. पावसाळ्यापूर्वी मोरबे धरणात कमी पाणीसाठा शिल्लक असल्याने पालिकेला ऐन उन्हाळयात विभागवार पाणीकपात करावी लागली होती.

## पाण्याचा अंदाज न आल्याने बुडणाऱ्या तरुणांना वाचवण्यात यश

■ मुरुड

येथील काशिद समुद्रकिनारी फिरण्यासाठी आलेले पुण्यातील पर्यटकांवर बाका प्रसंग ओढावला होता. मात्र, पोलिसांनी प्रसंगवधान राखल्याने त्यांच्यावरील संकट टळले. त्यामुळे पाचही पर्यटकांचे जीव वाचले आहेत. ही घटना सोमवारी (१९ ऑगस्ट) संध्याकाळी घडली.

यानंतर पुण्यातील पर्यटक कुटुंबाने पोलीस आणि जीवरक्षकांचे आभार मानून त्यांच्या धाडसाचे कौतुक केले. पुण्यातील हडपसरमधून राजेश्री मिश्रा, संजय मिश्रा, आयुशी मिश्रा, बाही



मिश्रा आणि सौम्य मिश्रा हे कुटुंब फिरण्यासाठी मुरुड-काशिद समुद्रकिनारी आले होते. पोहण्यासाठी मिश्रा कुटुंब समुद्रात उतरले. पण, समुद्राच्या पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले होते. त्यांच्या नाकातोंडात पाणी शिरू लागले होते. त्यावेळी गस्तीवर असलेले पोलीस नाईक चेतन वेळे यांच्या ही बाब लक्षात आली. त्यांनी लगेचच सायरन वाजवून जीवरक्षकांना बोलावले. जीवरक्षक राकेश रक्ते, शिवम लाड, सय्यम भोंबु आणि सुयोग महाडिक यांनी तत्परतेने मिश्रा कुटुंबाचे जीव वाचवले.

## 'आम्ही कुंडेगावकर' नामफलकाचे अनावरण

■ उरण

पागोटे ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच कुणाल पाटील हे विविध सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असतात. कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था ही संस्था सुद्धा विविध सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असते. उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीतील कुंडेगाव कोळीवाडा येथील ग्रामस्थांनी कुंडेगावात कुंडेगावचा अभिमान म्हणून एक नाम फलक असावा म्हणून नामफलका बाबत आपली इच्छा पागोटे ग्रामपंचायतचे सरपंच कुणाल पाटील व कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी सदस्यांकडे बोलून दाखविली. ग्रामस्थांची मागणी लक्षात घेउन चांगल्या कामाला सरपंच कुणाल पाटील व कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी सदस्यांनी लगेच होकार दिला.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सहा. आयुक्त एच/डब्ल्यू प्रभाग ह्यांचे कार्यालय, २ री हसनाबाद लेन, खार (प), मुंबई ४०००५२**

**क्र. एचडब्ल्यू/एसआर/२६५/ ईएक्सपी / एईएम. दि. २१.०८.२०२४**

**दरपत्रक सूचना**

एच/पश्चिम वॉर्डातील हरबा माऊली देवी मंदिरात गणेशोत्सवासाठी वॉटरप्रूफ स्वागत मंडप, खुर्च्या, सोफा, पायऱ्या, पूजेसाठी टेबल, बांबूचे बॅरिकेड्स आणि प्रमाणाचे वेळापत्रक उपलब्ध करून देण्यासाठी अनुभवी कंत्राटदारांकडून सीलबंद कोटेशन आमंत्रित केले आहे.

अटी व शर्तींसह रिक्त दरपत्रक अर्ज व एच. सी.(ईएक्सपी)च्या उपरोक्त पत्त्यावरून २२.०८.२०२४ पासून २९.०८.२०२४ पर्यंत सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० पर्यंत रु. १०००/- + १८% जीएसटी भरणा करून खरेदी करता येतील.

वरील सेवांसाठी इरठे रु. २००००/- (रु. वीस हजार फक्त). इरठे २९.०८.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी रोखीने भरावे लागेल.

दरपत्रक ३०.०८.२०२४ पर्यंत दुपारी १.०० पर्यंत स्वीकारले जाईल आणि त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता उघडले जाईल.

कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व कोटेशन बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम यांनी राखून ठेवला आहे.

पीआरओ/१००७/जाही/२०२४-२५

**गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.**

सही/-
सहाय्यक अभियंता (देखभाल)
एच / पश्चिम

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी महिलांनी बँक खाते आधार कार्डशी लिंक करावे!

### पालिकेचे आवाहन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पात्र महिलांनाही मोठ्या प्रमाणावर लाभ मिळालेला असून महानगरपालिकेच्या वतीने गतीमान कार्यवाही सुरू आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 31 जुलैपर्यंत अर्ज भरलेल्या 50 हजाराहून अधिक महिलांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला आहे.

तथापि 19,157 पात्र महिलांना त्यांचा अर्ज मंजूर झाल्याचे संदेश प्राप्त झाले आहेत, मात्र त्यांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न नसल्याने त्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा झालेली नसल्याचे निदर्शनास येत आहे.

त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या



मार्गदर्शनाखाली, आज नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध बँकांच्या व्यवस्थापनांची विशेष बैठक अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली, मुख्य लेखा वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, समाज विकास विभागाचे उपायुक्त श्री. किसनराव पलांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली.

या बैठकीमध्ये ज्या महिलांचे आधार कार्ड त्यांच्या बँक खात्याशी संलग्न नाही अशा महिलांचे आधार कार्ड विनाविलंब संलग्न करून घेण्याबाबत बँकांमध्ये स्वतंत्र कक्ष सुरू करण्याची व्यवस्था करावी असे सूचित करण्यात आले. त्याचप्रमाणे या महिलांपर्यंत त्यांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न करून घेण्याच्या सूचना विविध माध्यमातून पोहोचवाव्यात असे सांगण्यात आले. त्यानुसार 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज भरल्यानंतर अर्ज मंजूर झाल्याचा संदेश ज्या महिलांना प्राप्त झालेला आहे. तथापि त्यांच्या बँकेत अद्याप रक्कम जमा झालेली नाही,

## आदिवासींच्या कल्याणासाठी इंस्ट्रुमेंट मार्केटिंगची वृक्षारोपण मोहीम

**नाशिक :** स्पेश्यलाइज इंस्ट्रुमेंट मार्केटिंग कंपनी या भारतातील नामांकित कॉर्पोरेट कंपनीनं नुकतेच नाशिक जिल्ह्यातील सावरपाडा , सदडपाडा, मुरुमहट्टी तसेच दिल्ली, कलकत्ता व दक्षिण भारतातील काही आदिवासी पाडय़ांमधे आदिवासींच्या कल्याणासाठी वृक्षारोपण मोहीम सुरू करुन पर्यावरण रक्षणात पाऊल टाकलं . औषधी वनस्पती व स्थानिक प्रजातींच्या बहुउपयोगी वृक्षांची लागवड करुन निसर्गाचा समतोल राखत आदिवासी पाडय़ांतील आदिवासी बांधवांना शाश्वत उत्पन्न कसे मिळेल व त्यांचं जीवनमान कसं उंचावेल हा उदात्त हेतू ठेवून सदर उपक्रम सुरू केला आहे .अल्पावधीतच फळांचं उत्पन्न देणारी फळझाडे,औषधी वनस्पती यांची लागवड केल्यामुळे आदिवासी बांधवांना अधिक उत्पन्नाचा एक नवा स्त्रोत निर्माण होवून उदरनिर्वाहासाठी इतरत्र स्थलांतरीत होण्याची गरज भासणार नाही. याप्रसंगी स्थानिक आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी, मुरुमहट्टी आदिवासी पाड्यातील हरिदास राउत ,सावर पाड्यातील कृष्णा राउत आदींनी कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक सोनल संजिव देशपांडे व इतर पाहुण्यांचे अत्यंत आनंदात व आपुलकीने स्वागत केले .



## म ह त्वा चे

### सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या सदनिकेत चोरी

**पुणे :** सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या सदनिकेतून दागिने, रोकड असा नऊ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना मगरपट्टा भागात घडली. याप्रकरणी कामगाराला हडपसर पोलिसांनी अटक केली. सुनील सुदाम जगताप (वय ४८, रा. मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार निवृत्त न्यायाधीश आहेत. तक्रारदारांची शुश्रूषा करण्यासाठी जगताप याला कामावर ठेवण्यात आले होते. जगतापने कपाटातून वेळोवेळी सोने-चांदीचे दागिने, रोकड, कागदपत्रे असा नऊ लाखांचा ऐवज लांबविला. ऐवज चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पसार झालेल्या जगतापला पोलिसांनी अटक केली. चौकशीत त्याने मुलीच्या शिक्षणासाठी न्यायाधीशांच्या सदनिकेतून ऐवज चोरून नेल्याची कबुली दिली. सहायक पोलीस निरीक्षक संदीप मधाळे तपास करत आहेत.

### आर्थिक वादातून तरुणाची आत्महत्या

**पुणे :** आर्थिक वादातून तरुणाने धावत्या रेल्वेगाडी खाली उडून मारुन आत्महत्या केल्याची घटना खडकी रेल्वे स्थानक परिसरात घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन पाचजणांविरुद्ध बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ऋषीकेश जयदेव म्हसारे (वय २७, रा. इनामदारनगर, कोंढवा बुद्रुक) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी आनंद दंडनाईक, बालाजी बहिरवाल, गणेश बिबिनवरे, प्रशांत कदम, विकास कसबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत ऋषीकेशचे वडील जयदेव रामदास म्हसारे (वय ५८) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ऋषीकेश याने औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रम केला होता. तो एका औषध विक्री दुकानात कामाला होता. आरोपी दंडनाईक, बहिरवाल, बिबिनवरे, कदम, कसबे औषध विक्री दुकानात कामाला होता. त्याने त्यांच्याकडून हातउसने पैसे घेतले होते. दरमहा त्यांना तो पैसे परत करत होता.

# उद्योग आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी विमानतळ महत्त्वाचे - मुख्यमंत्री शिंदे

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रत्नागिरी विमानतळ टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन

**प्रतिनिधी**
**■ रत्नागिरी**

उद्योग, व्यवसाय आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी विमानतळ अत्यंत महत्त्वाचे आहे. हेलिकॉप्टर सेवा, टुरिस्ट सर्कीट तयार केल्यास मोठा फायदा होणार आहे. नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे हात तयार करा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



रत्नागिरी विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे कुदळ मारुन आणि कोनशिलेचे अनावरण करुन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते आज भूमिपूजन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री उदय सामंत, आमदार शेखर निकम, रविंद्र फाटक, कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, विमानतळ प्राधिकरणाचे व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, सिंधुरत्न समृद्ध योजनेचे विशेष निमंत्रित सदस्य किरण सामंत, मिरजोळे सरपंच रत्नदिप पाटील, शिरगाव सरपंच फरिदा काझी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीच्या बांधकामाचा प्रारंभ झाला, नवं दालन तयार झाल्याशिवाय राहणार नाही. जगाला टक्कर देणारे इथले पर्यटन आहे. त्यासाठी कनेक्टीव्हीटी खूप महत्त्वाची आहे. नाईट लँडीगची सुविधा केल्यास परदेशी पर्यटक वाढण्यास मदत होणार आहे. पूर्ण क्षमतेने विमानतळ चालले पाहिजे, असे करा. 10 हजार कोटींचे डिफेन्स सेक्टरमधील उद्योग इच्छुक आहेत. उद्योगासाठी पायाभूत सुविधा आणि वातावरण चांगले आहे. दावोसमध्ये 5 लाख कोटीचे सामंजस्य करार केले होते. त्यातील 70 टक्के अमंलबजावणी स्तरावर आहेत. उद्योग क्षेत्रात भरभराट होत आहे.

# प्रशासनाचा वचक नसल्याने बदलापूरसारख्या घटना घडतायत!

**प्रतिनिधी**
**■ गोंदिया**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शासनव्यवस्था सध्या राहिलेली नाही. मुळात प्रशासनाचा वचक गुन्हेगारावर राहिलेला नाही. त्यामुळेच पश्चिम बंगालच्या कोलकाता आणि महाराष्ट्रातील बदलापूर, अकोलासारख्या घटना घडतात. पुरोगामी महाराष्ट्रात अशा घटना घडणे ही येथील प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची टीका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गोंदिया येथे केली.

गोंदिया येथे आयोजित पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्याला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अमित ठाकरे, गोंदिया जिल्हा संघटक रितेश गर्ग, गोंदिया जिल्हाध्यक्ष मनीष चौरागडे, मन्नू लिल्हारे, तालुका अध्यक्ष मुकेश



मिश्रा उपस्थित होते. राज ठाकरे म्हणाले, प्रशासनाच्या अशा गळचेपी भूमिकेमुळेच येथील पोलिसांनाही आपले काम मनमोकळेपणाने करण्याची सूट राहिलेली नाही. त्यांनी पोलिसांवर इतका दबाव निर्माण केला आहे की पोलिसांनाही वाटतं की काही कमी जास्त झालं की बळी आपलाच जाणार, प्रशासन आपले हात वर करणार, यामुळेच पोलिसांचे हात बांधले गेले आहेत. एकदा माझ्या हातात सत्ता द्या, मग दाखवितो की कसे शासन-प्रशासन चालविले जाते. अशा निगरगट्ट प्रशासनामुळे संपूर्ण देशात महाराष्ट्राची बदनामी होत आहे. पण, येथील शासनाला याचं काहीही सोयरसुतक राहिलेले नसल्याचा आरोप केला.

कुणी संधी देणार नाही, संधी हेरून घ्यावी लागणार आहे. याकरिता पक्षाचा संघटनात्मक गाभा म्हणजेच की शेवटच्या माणसापर्यंत स्थानिक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी पोहोचणे गरजेचे आहे. ते गेल्या १९ वर्षांत या जिल्ह्यात झाल्याचे मला दिसून येत नाही. पुढील दोन महिन्यांत येथील जिल्हाध्यक्ष, तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष, शाखा अध्यक्ष, गट अध्यक्ष इथपर्यंत तुमची यंत्रणा पोहोचलेली आढळली तरच मी गोंदिया जिल्ह्यातील चारही विधानसभा लढवणार नाही. इतर पक्षांकडून सेटिंग करून पैसे कमवायला मी निवडणुकीची तिकिटे देणार नाही असे सांगत पदाधिकाऱ्यांना कानपिचक्या दिल्या.

# सर्व शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची होणार चारित्र्य तपासणी

## बदलापूरच्या घटनेनंतर बुलढाणा पोलिस विभागाचा निर्णय

**प्रतिनिधी**
**■ बुलढाणा**

बदलापूर येथील एका नामांकित शाळेत दोन चिमूरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हा पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आलं आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई यांची चारित्र्य तपासणी करण्याबाबतचा निर्णय पोलीस प्रशासनाकडून घेण्यात आला आहे.

बदलापूर येथे शाळेतील कर्मचाऱ्यानेच चार वर्षीय दोन मुलींवर




अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट आहे. शाळांमध्ये असे प्रकार होऊ नयेत म्हणून पोलीस प्रशासन देखील आता अलर्ट मोडवर आले असून याच अनुषंगाने बुलढाणा पोलीस प्रशासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी सर्व पोलीस स्थानकांना तशा सूचना देखील दिल्या आहेत.

पोलीस प्रशासनाच्या निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खाजगी, सरकारी शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यात सफाई कामगार, वाहन चालक, स्कूल बस चालक इत्यादी कर्मचाऱ्यांचे एका समितीद्वारे चारित्र्य तपासणी होणार आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड स्थानिक पोलीस स्टेशनला तयार करण्यात येणार आहे. ज्यामुळे एखादी घटना घडल्यास अशा आरोपींना शोधून काढणे सोयीचे होणार आहे.

# पुण्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार, 2 मित्रांसह मैत्रिणीवर गुन्हा

**प्रतिनिधी**
**■ पुणे**

बदलापुरातील चिमुकल्या मुलींवरील अत्याचार प्रकरणाचे राज्यभरात पडसाद उमटत असताना पुण्यातूनही संतपाजनक प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यात अल्पवयीन मुलीला दारू पाजून अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी २ मित्रांसह मैत्रिणीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी अत्याचार करणारे अल्पवयीन तरुणांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात अल्पवयीन तरुणीवर मैत्रिणीच्या मदतीने २ मित्रांनी अत्याचार केल्याची घटना घडली आहे. अल्पवयीन तरुणीला मैत्रिणीनेच दारू पाजल्याची बाब समोर आली आहे. पुण्यात एप्रिल महिन्यात घडलेला हा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

पुण्यातील हा संपूर्ण प्रकार एप्रिल महिन्यात घडला आहे. पीडित तरुणी आणि तिची मैत्रीण एकमेकांच्या घराजवळ राहतात. त्यामुळे त्यांची पहिल्यापासूनच ओळख होती. आरोपी मैत्रिणी हिने पीडित तरुणी हिला घेऊन तिच्या मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी नेले. पीडित तरुणीला रिक्षात बसवून मैत्रिणीने तिच्या मित्रांना सुद्धा पार्टीसाठी बोलवले होतं. मित्राच्या घरी हा सगळा प्रकार घडला आहे.

# नागपुरात मंकीपॉक्ससाठी बेड्स आरक्षित

**■ नागपुर**

जगभरात खळबळ माजवणाऱ्या मंकीपॉक्स आजाराने आता भारतातही धास्ती वाढवली. विशेष महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात मंकीपॉक्स आजाराता धोका पाहता प्रशासनाकडून काळजी घेतली जात आहे. मंकीपॉक्सच्या पार्श्वभूमीवर नागपुरातील नागपूर मेडिकल कॉलेज आणि इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज या दोन्ही रुग्णालयात बेड आरक्षित ठेवण्यात आले आहेत. वैद्यकीय शिक्षण खात्याचे सचिव दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी (20 ऑगस्ट) राज्यातील सर्वच वैद्यकीय महाविद्यालय आणि वैद्यकीय अधीक्षकांची बैठक घेत आरोग्य विभागाने सूचनांवर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

मंकीपॉक्सचे रुग्ण आढळल्यास त्याच्यावर उपचारासाठी मेयो आणि मेडिकल या दोन्ही शासकीय रुग्णालयांमध्ये प्रत्येकी पाच बेड आरक्षित करण्यात आले आहेत. तसेच संशयितांचे रक्ताचे नमुने घेऊन पुणे येथे राष्ट्रीय विषाणू प्रायोगशाळेत पाठवण्यात सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित आजार जास्त फोफावू नये, यासाठी आरोग्य विभागाकडून सर्वोतोपरी काळजी घेतली जात आहे.

## पीठ गिरणीवाले साहित्यिक गेले...

# कथा-कादंबरीकार महादेव मोरे यांचे निपाणीत निधन

**प्रतिनिधी**
**■ निपाणी**

मराठी साहित्य विश्वात आपले वेगळे स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक महादेव विठ्ठल मोरे यांचे बुधवारी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. ते 86 वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे मराठी साहित्य विश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. बुधवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात 8 भाऊ, 3 बहिणी, 3 मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडं असा मोठा परिवार आहे.

महादेव मोरे यांचा गत 22 जून रोजी 85 वा वाढदिवस साजरा करण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाने चिताक या कथासंग्रहासाठी त्यांचा पुरस्कार देऊन गौरव केला होता. तसेच सातारा प्रतिष्ठाननेही



जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते.

आशिया खंडात गाजलेल्या तंबाखू आंदोलनावर त्यांनी झोंबड हा कथासंग्रह लिहिला होता. तो त्या काळी फार गाजला होता. त्यांचे आत्तापर्यंत 16 कथासंग्रह, कादंबऱ्या, 4 ललित लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी अनेक साप्ताहिकांसाठीही लिखाण केले. महादेव मोरे यांचे महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील ज्येष्ठ तसेच नवीन साहित्यिकांशी चांगले संबंध होते.

# निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाची निर्घृण हत्या

**प्रतिनिधी**
**■ नाशिक**

पंचवटी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मेरी कंपाऊंडमध्ये मध्यरात्री एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाची निर्घृण हत्या झाल्याची घटना उघडकीस आलीय. या घटनेमुळं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रेम प्रकरणातून हत्या करण्यात आली असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. याबाबत पंचवटी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकच्या पंचवटी परिसरातील मेरी कंपाऊंड भागात मराठा समाजाच्या वसतीगृहाबाहेर गगन प्रवीण कोकाटे (वय 28) रा. वृंदावन नगर, म्हसरूळ, नाशिक या युवकाची मंगळवार 20 तारखेला मध्यरात्री अडीच ते तीन वाजेच्या सुमारास अज्ञात संशयितांनी डोक्यात तीक्ष्ण हत्यारानं वार करून हत्या केली. ही घटना सकाळी काही लोकांच्या निदर्शनास आल्यानं



उघडकीस आली आहे. याबाबत सकाळी सात वाजेच्या सुमारास काही नागरिकांना रक्ताच्या थारोळ्यात गगन याचा मृतदेह आढळून आल्यानंतर याची माहिती पंचवटी पोलिसांना दिल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, पोलीस निरीक्षक ज्योती आमने यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

प्रेम प्रकरणातून हत्या - यावेळी पोलिसांना गगन याच्या खिशातून एक चिट्ठी मिळाली असल्याची माहिती आणि ही हत्या प्रथमदर्शनी प्रेम प्रकरणातून झाली असल्याचा संशय वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांनी व्यक्त केला आहे. या हत्येतील मारेकऱ्यांच्या शोधार्थ पोलिसांची पथकं रवाना करण्यात आली आहेत.

निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा - काही दिवसांपूर्वी पोलीस सेवेतून निवृत्त झालेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कोकाटे यांचा गगन हा धाकटा मुलगा होता. गगन याची हत्या झाल्याची घटना समजताच नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती. तसंच या घटनेमुळं पोलीस वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# लोककला कलावंत साहित्यिक परिषद संपन्न

**प्रतिनिधी**
**■ अहमदनगर**

अहिल्याबाई होळकर नगर ता. श्रीरामपूर येथील लोकमान्य टिळक वाचनालय आगाशे सभागृहात लोककला कलावंत साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय काव्य संमेलन आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक उत्तमराव दासु तरकसे यांचा नुकताच प्रकाशित झालेला शाहीची नोंद या काव्यसंग्रह करिता व साहित्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य भूषण पुरस्कार २०२४ चा पुरस्कार प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला

यावेळी उत्तम तरकसे यांनी आपले विचार मांडताना डॉ. अण्णाभाऊ साठे



म्हणाले होते पृथ्वी शेषनागाच्या फण्यावर नाही तर श्रमिकांच्या श्रमावर उभी आहे परंतु मी म्हणतो पृथ्वी ही छ. शिवाजी महाराज शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारावर उभी आहे असे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब पवार डॉ. बाबुराव उपाध्ये (ज्येष्ठ साहित्यिक) उद्घाटक किशोर निर्मल प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. अंबादास सकट (साहित्यिक). बाबासाहेब सौदागर (चित्रपट गीतकार) सायमन भास्कर (साहित्यिक) लहानुदास खरात (समाजसेवक) असे प्रमुख पाहुणे विचार मंचावर उपस्थित होते.

# विद्यार्थिनींच्या विनयभंगप्रकरणी नराधम शिक्षक सेवेतून बडतर्फ

## मुख्याध्यापकांवरही कारवाई

**प्रतिनिधी**
**■ अकोला**

एकीकडे राज्यात बदलापूरची घटना ताजी असतानाच दुसरीकडे अकोल्यामधून एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. एका नराधम शिक्षकाने तब्बल 6 विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी आता नराधम शिक्षकावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. आरोपी शिक्षक प्रमोद सरदारला सेवेतून बडतर्फ करण्यात आहे तर संबंधित शाळेच्या मुख्यध्यापकांवरही कारवाई केली आहे.

अकोल्याच्या बाळापूर तालुक्यातील काजीखेड येथे जिल्हा परिषदच्या उच्च माध्यमिक शाळेतील नराधम शिक्षक प्रमोद सरदार हा गेल्या चार महिन्यांपासून 8 वीच्या मुलींना अश्लिल व्हिडीओ दाखवत त्यांचा छळ करत होता. मंगळवारी या घटनेसंदर्भात पीडित मुलींनी त्यांच्या पालकांना यासंदर्भात सांगितल्यावर हा धक्कादायक प्रकार



समोर आला. त्यानंतर संतप्त झालेल्या पालकांनी उरळ पोलीस ठाण्यात धाव घेत नराधम शिक्षकाविरोधात तक्रार दाखल केली. प्रमोद सरकार विरोधात गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी तत्काळ त्याला अटक केली. मात्र हा प्रकार समोर आल्यानंतर स्थानिक नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्य आशा मिरगे यांनीही नराधम शिक्षकांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

अकोल्यातील प्रकरण समोर आल्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गट आणि मनसेच्या महिला कार्यकर्त्यांकडून आज अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी त्यांनी दोषीवर कडक कारवाईची मागणी केली. याशिवाय बाळापूरचे ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांनी आज गावातील शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनाही आरोपी शिक्षकावर कठोर कारवाईची मागणी सरकारकडे केली होती. अशातच आता जिल्हा परिषदेने नराधम शिक्षकाला पदावरून बडतर्फ केले आहे. एवढेच नाही तर जिल्हा परिषदेने शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र समदूर आणि केंद्र प्रमुखाला कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबित केले आहे. काजीखेड येथील जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शाळेतील आरोप प्रमोद सरदार हा शिक्षक गेल्या चार महिन्यांपासून विद्यार्थिनींच्या असहाय्यतेचा फायदा घेत होता.

# एकतर्फी प्रेमातून छळ केल्यानं 16 वर्षीय मुलीची आत्महत्या

## नागरिकांनी केला 'रास्ता रोको'



**प्रतिनिधी**
**■ संभाजीनगर**

शहरात एकतर्फी प्रेमातून झालेल्या छळाला कंटाळून १६ वर्षीय तरुणीनं आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जटवाडा भागात घडली. दुचाकी मेकॅनिकनं प्रेम करण्यासाठी दबाव टाकून तरुणीला त्रास दिला. त्यामुळे पीडितेनं आत्महत्या केली असल्याची तक्रार कुटुंबीयांनी पोलिसात दिली आहे. या घटनेनंतर स्थानिक रहिवासी संतप्त झाले आहेत. त्यांनी हर्सूल टी पॉइंट रस्त्यावर 'रास्ता रोको' आंदोलन करत आरोपीला फाशीची शिक्षा करत कडक शिक्षा करण्याची मागणी केली.

अकरावी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या तरुणीनं जटवाडा भागात आत्महत्या केली. त्याच भागात राहणाऱ्या गाडीचे गॅरेज चालवणाऱ्या तरुणाच्या त्रासाला कंटाळून तिनं टोकाचं पाऊल उचललं होतं. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांसह सकल हिंदू समाजाचा वतीनं आंदोलनाची हाक दिली. मुख्य आरोपीस इतर आरोपींना कडक शासन करण्याची मागणी करण्यात आली. हर्सूल टी पॉइंट रस्त्यावर रास्ता रोको केला. आरोपींना भरचौकात फाशी द्या, अशी घोषणाबाजी आंदोलकांनी केली.

# 'एमपीएससी'विरोधात दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरूच

## 25 ऑगस्टची पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्याची मागणी

**प्रतिनिधी**
**■ पुणे**

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लाल बहादूर शास्त्री रस्त्यावरील अहिल्या लायब्ररीसमोर मंगळवारी (दि. २०) सायंकाळी सुरू केलेले आंदोलन दुसऱ्या दिवशीही सुरू होते. आयोगाने विविध मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी बुधवारी सकाळी मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाल्याने आंदोलनाची तीव्रता वाढली. विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करीत, तसेच मागण्यांचे पोस्टर हातात धरत दिवसभर आंदोलनाची धग कायम ठेवली.

राज्यसेवा पूर्व परीक्षेचे येत्या रविवारी (दि. २५ जुलै) आयोजन केले जाणार आहे. मात्र, त्याच दिवशी आयबीपीएसतर्फे बॅंकिंग क्षेत्रातील विविध पदभरतीसाठीची परीक्षा नियोजित आहे. आयबीपीएस सुमारे वर्षभरापूर्वी परीक्षेची तारीख निश्चित केली



होती. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांनी आयबीपीएस परीक्षेसाठी अर्ज केले असून, मागील वर्षभरापासून ते तयारी करीत आहेत. त्यात एमपीएससीने लोकसभा निवडणूक आरक्षण आणि इतर कारणामुळे राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या तारखेत वेळोवेळी बदल केला आणि दि. २५ जुलैला परीक्षेचे आयोजन केले आहे. त्यामुळे या दोन्ही परीक्षेचे फॉर्म भरलेल्या उमेदवारांना एका परीक्षेला मुकावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे एमपीएससीने २५ जुलैला परीक्षेची तारीख पुढे ढकलावी, अशी मागणी केली जात आहे.

मागील अनेक वर्षांपासून कृषी विभागातील पदभरती केलेली नाही. कृषी विभागाने नुकतेच २५८ पदे एमपीएससीकडे भरतीसाठी वर्ग केली आहेत. त्यामुळे २०२४ च्या जाहिरातीत ही पदे समाविष्ट करावीत आणि पूर्वपरीक्षा घ्यावी, असे कृषी पदवीधर उमेदवारांनी सांगितले. दरम्यान, बुधवारी दुपारी खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलन स्थळाला भेट देत विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

## ब्रिस्बेन बॅडमिंटन स्पर्धा; चिन्मय, जुडचे दुहेरीत यश

**मुंबई :** नुकत्याच ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन बॅडमिंटन असोसिएशनने आयोजित केलेल्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत वयस्कर मास्टर्स विभागात ३५ वर्षावरील वयोगटात मुंबईच्या चिन्मय ढवळे, ज्यूड वर्नकुला जोडीने दुहेरीचे विजेते पद पटकावले. स्पर्धेतील लढती "राऊंड रॉबिन" पद्धतीवर घेण्यात आल्या. त्यामध्ये १० जोड्यांचा समावेश होता. त्यामध्ये चिन्मय आणि जुडने आपले सर्व सामने जिंकून अव्वल क्रमांक मिळवला. त्या जोरावर या जोडीला जेतेपद बहाल करण्यात आले. उपविजेते पद धर्मतेजा मानसिंग आणि संदीप गवाणकर या जोडीला मिळाले. सुरुवातीच्या काळात आयकर खात्याचे माजी बुजुर्ग आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू मिलिंद पूर्णपात्रे यांचे मार्गदर्शन चिन्मय ढवळेला मिळाले होते. चिन्मय चे वडिल चांगले क्रिकेटपटू असून ते टाइम्स ढाल, कांगा लिग क्रिकेट स्पर्धेत खेळले आहेत. या स्पर्धेत काही नामवंत ऑस्ट्रेलियन खेळाडूंचा सहभाग होता. पुरुष एकेरी, महिला एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरी अश्या ५ गटात सामने खेळवण्यात आले.



## 17 वर्षांखालील जागतिक कुस्तीत रौनक दहियाला कांस्यपदक

वृत्तसंस्था

■ अम्मान

जॉर्डनच्या अम्मान येथे सुरू असलेल्या १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती चॅम्पियनशिप २०२४ मध्ये मंगळवारी भारताने पहिले पदक जिंकले. युवा कुस्तीपटू रौनक दहियाने ग्रीको-रोमन ११० किलो गटात कांस्यपदक पटकावले आहे. कांस्यपदकाच्या लढतीत रौनकने तुर्कियेच्या इमरुल्ला कॅपकनचा ६-१ असा पराभव केला. तत्पूर्वी, उपांत्य फेरीत रौनकला हंगेरीच्यामरुल्ला कॅपकनचा ६-१ पराभव केला. युक्रेनच्या इव्हान यांकोव्स्कीने सुवर्णपदक जिंकले.या प्रकारातील सुवर्णपदक युक्रेनच्या इव्हान यांकोव्स्कीने पटकावले आहे. त्याने अंतिम सामन्यात झोल्टन जॅकोचा १३-४ असा पराभव केला.



दिल्लीच्या प्रसिद्ध छत्रसाल स्टेडियममध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या रौनक दहियाने आपल्या चॅम्पियनशिप मोहिमेची सुरुवात आर्टूर मानवेलयानवर ८ -१ असा विजय मिळवून केली. यानंतर रौनकने डॅनियल मास्लाकोवर तांत्रिक श्रेष्ठतेने विजय मिळवला. मात्र उपांत्य फेरीचा सामना गमावल्यामुळे तो सुवर्णपदकाच्या शर्यतीतून बाहेर पडला.उपांत्य फेरीच्या सामन्यात रौनकला हंगेरीच्या झोल्टन जाकोकडून ०-२ ने पराभव पत्करावा लागला होता.

## जय शहा होणार आयसीसी अध्यक्ष उमेदवारीसाठी 6 दिवस बाकी

### विद्यमान अध्यक्ष बार्कलेंचा कार्यकाळ 30 नोव्हेंबरला संपणार

वृत्तसंस्था

■ लंडन

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (BCCI) सचिव जय शहा हे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (ICC) पुढील अध्यक्ष होऊ शकतात. त्यांचा दावा मजबूत मानला जात आहे. आयसीसीचे विद्यमान अध्यक्ष ग्रेग बार्कले यांचा कार्यकाळ ३० नोव्हेंबर रोजी संपत आहे. बार्कले यांनी मंगळवारी सांगितले की ते तिसऱ्या टर्मसाठी इच्छूक नाहीत.यानंतर बीसीसीआयचे सचिव जय शहा आयसीसीचे अध्यक्ष बनण्याची चर्चा जोरात आली आहे. मात्र, अद्याप बीसीसीआय किंवा जय शाह यांनी याबाबत कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही.

आयसीसीचे अध्यक्ष ग्रेग बार्कले यांनी पुष्टी केली आहे की ते



तिसऱ्या कार्यकाळासाठी उभे राहणार नाहीत आणि नोव्हेंबरच्या अखेरीस त्यांचा वर्तमान कार्यकाळ संपल्यावर ते पद सोडतील," असे आयसीसीने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

२७ ऑगस्ट ही आयसीसी अध्यक्षपदासाठी नामांकनाची अंतिम तारीख आहे. आयसीसी अध्यक्षांचा कार्यकाळ दोन वर्षांचा असतो. ते सलग तीन वेळा अध्यक्ष होऊ शकतात. न्यूझीलंडचे बार्कले नोव्हेंबर 2020 मध्ये ICC चे अध्यक्ष झाले. त्यानंतर २०२२ मध्ये त्यांची या पदावर पुन्हा निवड झाली.

ICC नियमांनुसार, अध्यक्षपदाच्या निवडणुकीत १६ मते आहेत आणि विजेत्यासाठी ९ मतांचे साधे बहुमत (५१ %) आवश्यक आहे. यापूर्वी अध्यक्ष होण्यासाठी विद्यमान उमेदवाराला दोन तृतीयांश बहुमत आवश्यक होते.

***जय शहा अध्यक्ष होण्याची चर्चा का?***

*शहा यांच्या बीसीसीआय सचिवपदाच्या कार्यकाळात एक वर्ष शिल्लक असल्याने जय शहा अध्यक्ष होणार असल्याची चर्चा आहे. बीसीसीआयच्या घटनेनुसार, तीन वर्षांच्या कूलिंग ऑफ कालावधीपूर्वी पदाधिकारी सहा वर्षे पदावर राहू शकतो. एकंदरीत एक व्यक्ती एकूण १८ वर्षे या पदावर राहू शकते ज्यात राज्य संघटनेत नऊ वर्षे आणि BCCI मध्ये नऊ वर्षांचा समावेश आहे.जय शहा ऑक्टोबर २०१९ मध्ये बीसीसीआय सचिव बनले. त्यानंतर २०२२ मध्ये त्यांची पुन्हा बीसीसीआय सचिवपदी निवड झाली. बीसीसीआयच्या नियमांनुसार, २०२५ मध्ये सध्याचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर त्यांना कुलिंग ऑफ पिरियडमध्ये जावे लागेल.जय शाह सध्या आयसीसीच्या वित्त आणि वाणिज्य उपसमितीचे अध्यक्ष आहेत. यासोबतच १६ मतदारांपैकी बहुतांश सदस्यांशी त्यांचे चांगले संबंध आहेत.*

## बीओबी कॅरम स्पर्धेत इंदिरा राणे, विकास महाडिक विजेते



प्रतिनिधी

■ मुंबई

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय कॅरम संघ निवड चाचणी स्पर्धेमध्ये महिला एकेरीत इंदिरा राणेने तर पुरुष एकेरीत विकास महाडिकने विजेतेपद पटकाविले. महिलांच्या अंतिम सामन्यात सुचित्रा कुमारीने ५-० गुणांसह इंदिरा राणेविरुध्द प्रारंभ धडाकेबाज केला. परंतु त्यानंतर आक्रमक व अचूक खेळासह राणीवर सतत कब्जा मिळवीत इंदिरा राणेने १९-५ अशी बाजी मारली आणि अजिंक्यपदाला गवसणी घातली. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण, बीओबी कॅरम विभागाचे संयोजक प्रदीप सुरोशे व मनोज नागरे, प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या-उपविजेत्यांना गौरविण्यात आले.

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागतर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने परेल येथील आरएमएमएस सभागृहात झालेल्या चाचणी कॅरम स्पर्धेत एकूण ७६ खेळाडूंनी भाग घेतला होता. पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत विकास महाडिकने हेमंत शेलारचे आव्हान १२-२ असे सहज संपुष्टात आणतांना सहाव्या फेरीत देखील सहजसुंदर खेळ केला. विकासने बहुतांश प्रतिस्पर्ध्यांना नील गेम देत स्पर्धेवर निर्विवाद वर्चस्व राखले. बँक ऑफ बडोदा, मुंबई विभागीय पुरुष संघात विकास महाडिक, हेमंत शेलार, मिरपला राव, अझर अन्सारी तर महिला विभागात इंदिरा राणे, सुचित्रा कुमारी, सिध्दी तोडणकर, ज्योती श्रीमल यांची निवड झाली असून चेन्नई येथे २९ ऑगस्टपासून होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील आंतर विभागीय बीओबी कॅरम स्पर्धेमध्ये बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय पुरुष व महिला कॅरम संघाचे ते प्रतिनिधित्व करणार आहेत. पंचाचे कामकाज सचिन शिंदे, अविनाश महाडिक, ओमकार चव्हाण, वेदांत महाडिक, सी. विनय, यश पालकर आदींनी केले.

## बेस्टच्या कंत्राटी बसचालकांचे देवनार डेपोमध्ये आंदोलन ; प्रवाशांना मन:स्ताप

प्रतिनिधी

■ मुंबई

बेस्ट उपक्रमातील कंत्राटी बस चालकांची बेस्टच्या देवनार बस डेपोतील अधिकाऱ्यांशी शाब्दिक वाद झाला. एवढेच निमित्त घडले आणि कंत्राटी बस चालकांनी देवनार बस डेपोमध्ये अचानकपणे तीव्र आंदोलन केले. त्यामुळे या बस डेपोशी संबोधित बससेवा ठप्प झाली. परिणामी बस प्रवाशांना त्याचा मोठा फटका बसला. रात्री उशिरापर्यंत हे आंदोलन चालू होते.

बेस्ट उपक्रमाच्या देवनार बस डेपोमध्ये डागा एसएमपीटीएलच्या खाजगी ९२ एसी बस गाड्या आहेत त्या बसवर कंत्राटदाराचे बस चालक आहेत . या डेपोमध्ये मंगळवारी नेहमीप्रमाणे कामकाज सुरू असताना कंत्राटी तत्वावरील बस चालकाचा देवनार बस डेपोमधील संबंधित अधिकाऱ्यांशी शाब्दिक चकमक उडाली आणि त्यांचे जोरदार भांडण झाले. त्यामुळे कंत्राटी बस चालकांनी बेस्ट अधिकाऱ्यांवरील संताप व्यक्त करण्यासाठी दुपारी १ वाजताच्या सुमारास अचानकपणे काम बंद आंदोलनाचे अस्त्र उगारत बस प्रवाशांना वेठीस धरले. त्यामुळे देवनार बस डेपोमधील बस सेवा ठप्प झाली.

सदर डेपोमध्ये बसचा वापर करून प्रवास करणाऱ्या बस प्रवाशांची गोची झाली. या प्रवाशांना कंत्राटी तत्वावरील बस चालकांच्या या आंदोलनाचा मोठा फटका बसला. त्यांना पर्यायी व्यवस्था पत्करून घर, कार्यालय गाठावे लागले. तर, बस सेवा सुरू होण्याची बराच वेळ ताटकळत प्रतीक्षा करणाऱ्या बस प्रवाशांचे या आंदोलनामुळे चांगलेच हाल झाले.

रात्री उशिरापर्यंत सदर आंदोलनाबाबत तोडगा निघू शकला नाही. देवनार डेपोमधील सर्व बसगाड्या बाहेर काढण्यास बस चालकांनी नकार दिला त्यामुळे संपूर्ण बस डेपोमधील बस वाहतूक ठप्प झाली. त्याचा मोठा फटका बस प्रवाशांना बसला. या कंत्राटदाराकडून देवनार डेपोमार्फत लांबचे बसमार्ग चालवले जातात. त्या सर्व मार्गावर दुपारनंतर बस न धावल्याने त्याचा मोठा फटका बस प्रवाशांना बसला आणि बेस्टच्या उत्पन्नावर सुद्धा त्याचा काहीसा परिणाम झाला.



***मुंबई :*** *भांडुप मुंबई येथील रहिवाशी तसेच जीवन प्रबोधिनी ट्रस्ट चे सदस्य सतिश सिताराम कार्लेकर, यांची नामदार मंगलप्रभात लोढा पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्या शिफारशीने नुकतीच मुंबई उपनगर जिल्ह्यातून महाराष्ट्र शासनाच्या विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती झाली त्याबद्दल जीवन प्रबोधिनी ट्रस्टच्या वतीने बृहन्मुंबई महापालिकेतील पालकमंत्री कार्यालयात शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी जीवन प्रबोधिनी ट्रस्ट चे संस्थापक सत्यवान नर, पत्रकार राजेश सावंत, संदेश राणे,मोहन चंदे, स्वप्नील चंदे आदी उपस्थित होते.*

## फिटजी टॅलेंट रिवॉर्ड परीक्षेची घोषणा

प्रतिनिधी

■ मुंबई

जेईई आणि इतर स्पर्धा व शैक्षणिक परीक्षांच्या तयारीसाठी भारतातील एक प्रमुख संस्था, वर्षभरातील सर्वात मोठी व बहुप्रतीक्षित परीक्षा, फिटजी टॅलेंट रिवॉर्ड परीक्षेचे (एफटीआरई) आयोजन करत आहे. इयत्ता पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी आणि अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षेमुळे लक्षणीय शैक्षणिक लाभ मिळतात. एफटीआरई विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासामध्ये एकमेव आणि सर्वसमावेशक ३६० डिग्री अकॅडेमिक डायग्नोस्टिक टूल पुरवून त्यांना सक्षम बनवते. ही परीक्षा अनेक तारखांना ऑफलाईन, कम्प्युटर बेस्ड (सीबीटी) आणि प्रॉक्टर्ड ऑनलाईन मोडमध्ये घेतली जाईल. रोख शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना १५ सप्टेंबर किंवा ६ ऑक्टोबर २०२४ रोजी कम्प्युटर बेस्ड (सीबीटी) किंवा ऑफलाईन मोड टेस्टमध्ये एफटीआरईसाठी उपस्थित राहावे लागेल.

## बेकऱ्यांतील लाकडाचा वापर आरोग्याला हानिकारक; बीइएजी संस्थेच्या अभ्यासातून उघड

सुनील शिंदे

■ मुंबई

मुंबईतल्या बेक-यांमध्ये प्रदूषण पसरवणा-या लाकडाचा इंधन म्हणून वापर केला जातो. यामुळे हानीकारक अशा प्रदूषकांचे उत्सर्जन होते. यामध्ये पार्टिक्यूलेट मॅटर, मिथेन, कार्बन डायऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड आणि व्होलटाइल ऑर्गेनिक कंपाऊंड्स यांसारख्या प्रदूषक उत्सर्जनामुळे आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत आहे. मुंबईतील २०० बेक-यांपैकी ४७.१० टक्के बेक-यांत लाकडाचा इंधन म्हणून वापर केला जात असून ते आरोग्यास हानिकारक आहे. एन्व्हिजनिंग असस्टेनेबल बेकरी इंडस्ट्री फॉर मुंबई' हा बीइएजी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाच्या अभ्यासातून हे समोर आले आहे. हवा प्रदूषणाशी लढण्यासाठी मुंबईतील बेकऱ्यांनी स्वच्छ इंधनाचा वापर करावा अशा सूचना संस्थेने केल्या आहेत. संस्थेने काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

बेकरी क्षेत्रामुळे होणाऱ्या मुंबईतील हवा प्रदूषणावर बॉम्बे एन्व्हॉयर्नमेंटल ॲक्शन ग्रुपने (बीइएजी ) केलेल्या सहा महिन्यांच्या तांत्रिक अभ्यासाद्वारे बेक-यांमध्ये इंधन म्हणून लाकडाचा वापर केला जात असल्याचे समोर आले आहे. लाकडाच्या वापरामुळे प्रदूषण निर्माण होते व ते आरोग्याला गंभीर धोका निर्माण करीत असल्याची धक्कादायक बाब या अभ्यासाद्वारे तयार केलेल्या अहवालातून समोर आली आहे.

एन्व्हिजनिंग असस्टेनेबल बेकरी इंडस्ट्री फॉर मुंबई या अभ्यासात एकूण २०० बेकरींचे सर्वेक्षण करण्यात आले. यात ४७.१० टक्के बेक-यांत लाकडाचा इंधन म्हणून वापर केला जात असल्याचे आढळले. लाकडाचा वापर करतात असे आढळले. यामुळे हानीकारक अशा प्रदूषकांचे उत्सर्जन होते. यामध्ये पार्टिक्यूलेट मॅटर, मिथेन, कार्बन डायऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड आणि व्होलटाइल ऑर्गेनिक कंपाऊंड्स (व्हिओसीज्) यांसारख्या प्रदूषकांचा यामध्ये समावेश आहे. या उत्सर्जनामुळे मुंबईकरांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत आहे, असे बीइएजी संस्थेने केलेल्या अभ्यासातून निरीक्षण बुधवारी मांडले आहे. बेकरींमध्ये लाकडाऐवजी स्वच्छ इंधनाचा वापर करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत.

लाकडाचा वापर करणाऱ्या बेकरी दिवसाला सर्वसाधारणपणे सरासरी सुमारे १३० किलो लाकूड वापरतात. तर मोठ्या प्रमाणात लाकडाचा वापर करणाऱ्या बेकरी या दिवसाला सुमारे २५० ते ३०० किलो दरम्यान लाकडाचा इंधन म्हणून वापर करतात. साधारणपणे २० किलो पीठापासून पाव करण्यासाठी चार ते पाच किलो लाकूड गरजेचे असते. भंगार लाकडाची किंमत साधारण एका किलोला चार ते पाच रुपये अशी आहे, तर लॉगवूड १० ते १२ रुपये किलो आहे. लाकूड जाळणाऱ्या बेकरींमध्ये तयार होणाऱ्या राखेची विल्हेवाट ही बहुतांशी डंपिंग ग्राऊंडवर केली जाते. यामुळे हवा प्रदूषणात भर पडते. या सर्वाचा पर्यावरणावर होणारा परिणाम हा धक्कादायक असल्याचे संस्थेने म्हटले आहे.

बेकरींमधील उत्सर्जन हे पीएम १० आणि पीएम २.५ यांचे प्राथमिक स्रोत आहे. ज्यांचे सूक्ष्म कण फुफ्फुसांमध्ये अगदी आतपर्यंत पोहचत असल्यामुळे श्वसनाच्या, हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांना कारणीभूत ठरतात. भंगार लाकूड जाळल्याने तयार होणारे व्हिओसीज् हे कर्करोग, अस्थमा आणि इतर अनेक आजारांसाठी कारणीभूत असतात, ही गंभीर बाब अभ्यासातून समोर आली आहे.

## बृहन्मुंबई महापालिकेच्या बहुतांश शाळामध्येही सीसीटीव्ही कॅमरे नाहीत

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याची सपाची मागणी

प्रतिनिधी

■ मुंबई

राज्यात बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, ही चिंतेची बाब आहे. मुंबईतही अशा घटना उघडकीस आल्या आहेत. बदलापूर येथील घटनेनंतर राज्यातील सर्व शासकीय व खासगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे निर्देश शालेय शिक्षण मंत्र्यांनी दिले आहेत. तसेच विशाखा समितीही नियुक्ती केली जाणार आहे. मात्र मुंबईतील पालकांसह बहुतांश शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेर बसवण्यात आलेले नाहीत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने पालिकेच्या सर्व शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे व आवश्यक उपाययोजना करण्यात या. अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



राज्यात लैंगिक अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बदलापूरच्या हादरवणा-या घटनेनंतर शाळांतील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बदलापूरच्या घटनेत पीडितेच्या शाळेत सीसीटीव्ही नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा घटनांना आळा बसावा म्हणून शालेय शिक्षण मंत्री यांनी राज्यातील शासकीय व खाजगी अशा सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच सर्व शाळांमध्ये विशाखा समिती स्थापन करण्यात येणार असल्याचीही त्यांनी घोषणा केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळांमध्ये तसेच सरकारी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. पाच वर्षापूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वपक्षीय गटनेत्यांच्या सभेत पालिका शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय झाला होता. मात्र आजपर्यंत याची अंमलबजावणी झालेली नाही, याकडे सपाचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून लक्ष वेधले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पालिकेच्या सर्व शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे तसेच आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणीही शेख यांनी केली आहे.

## आंबेडकरवादी भारत मिशनचे मुंबईत धरणे



प्रतिनिधी

■ मुंबई

अनुसूचित जाती, जमातींचे उप वर्गीकरण करून त्यांचा घटनात्मक स्वतंत्र ' वर्ग ' नष्ट करण्याच्या विरोधात आंबेडकरवादी भारत मिशन तर्फे बुधवारी आझाद मैदानात दलित एकता धरणे पार पडले. त्यात दलित पँथरचे सह संस्थापक ज. वि. पवार मार्गदर्शन करताना. सोबत व्यासपीठावर डावीकडून ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, पँथर नेते सुरेश केदारे, मिलिंद सुर्वे, ज्येष्ठ पत्रकार सुनील खोब्रागडे, अच्युत भोईटे, दलित सेनेचे नेते रवी गरुड.रिपाइं ( सेक्युलर) चे अध्यक्ष श्यामदादा गायकवाड यांनीही धरण्याला भेट देवून या लढ्याला पाठिंबा दिला.

उप वर्गीकरणाचा निकाल रद्द करणारा अध्यादेश केंद्र सरकारने त्वरित काढावा, अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे अध्यक्ष, घटनातज्ज्ञ डॉ. सुरेश माने यांनी धरण्यातील आपल्या भाषणात केली.

या धरण्यात बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी, आंबेडकरवादी भारत मिशन, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर), पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (राष्ट्रवादी), स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष, दलीत पँथर, दलित सेना, ऑल इंडिया पँथर सेना, सी पी आय एम एल (लिब्रेशन), दलीत युथ पँथर, बहुजन संग्राम, विविध एस.सी, एस.टी कर्मचारी, प्राध्यापक संघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट्स असोसिएशन इतर संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.




***मुंबई :*** *काँग्रेसचे माजी आमदार मधु अण्णा चव्हाण यांनी भायखळा विधानसभा मतदार संघातील विविध गोविंदा पथकांना टी-शर्टचे वाटप केले. यावेळी काँग्रेसचे युवा नेते समीर चव्हाण, विजय यादव आणि ईतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

### दोन वर्षात इंदूमिल स्थळी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्याचे आश्वासन

## ना. रामदास आठवले यांनी राज्यपालांसोबत केली डॉ. आंबेडकर स्मारकाची पाहणी

प्रतिनिधी

■ मुंबई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर राष्ट्रनिर्माते नेते होते. त्यांनी समानतेसाठी आपले जीवन वेचले. डॉ. आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक ही त्यांना यथोचित आदरांजली असून या स्मारकामुळे देश विदेशातील लोकांना डॉ. आंबेडकर यांच्या कार्याची महती कळेल, असे राज्यपालांनी यावेळी बोलताना सांगितले. डॉ. आंबेडकर यांच्या भव्य स्मारकामुळे भारतीय समाज अधिक सशक्त व एकसंध होण्यास मदत होईल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. सुरुवातीला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले व राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी राज्यपालांचे स्वागत केले.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी आग्रह केल्यामुळे आज इंडुमिल स्थळी निर्माण होणाऱ्या



डॉ आंबेडकर स्मारक कामाचा आढावा घेतला.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होत असलेल्या इंदुमिल स्थळी भेट देऊन आपण धन्य झालो असे महामहीम राज्यपाल डॉ सिपी राधाकृष्णन यावेळी म्हणाले.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे करण्यात आलेल्या सादरीकरणाचे वेळी राज्यपालांनी स्मारकाच्या निर्मितीच्या प्रगतीचा आढावा घेतला. स्मारकामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी करण्यात येत असलेल्या सोयी - सुविधा तसेच स्मारकाचे तीव्र वादळापासून संरक्षण होण्यासाठी केलेल्या उपाययोजनाबद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली.

इंडूमिल स्थळी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतराराष्ट्रीय दर्जाचे स्मारक येत्या दोन वर्षात पूर्ण होईल. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा सर्वात उंच पुतळा स्टॅच्यू ऑफ इक्वालोटी येथे उभारला जाणार आहे.त्या पुतळयाचे कामात कोविड कालावधीमुळे दिरंगाई झाली. आता एकूण स्मारकांचे काम ७५ टक्क्यांपेक्षा अधिक झाले आहे अशी माहिती यावेळी ना.रामदास आठवले यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली. यावेळी रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; घनश्याम चिरणकर; चंद्रशेखर कांबळे; भदंत राहुल बोधी महाथेरो; नागसेन कांबळे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## समान नागरी कायद्याची गरज वाटत नाही - धनराज थोरात

### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्याना महाराष्ट्र परिवर्तन सेना पक्षाचे निवेदन

प्रतिनिधी

■ मुंबई

केंद्र सरकारच्या समान नागरी कायदा लागु करण्याच्या निर्णयाला विरोध करणारी भूमिका महाराष्ट्र परिवर्तन सेना पक्षाने घेतली आहे. महाराष्ट्र परिवर्तन सेना अध्यक्ष धनराज थोरात यांनी समान नागरी कायद्या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना निवेदन पत्र देऊन या निर्णयाला विरोध करत महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना प्रथम करण्यात यावी अशी मागणीही करण्यात आली आहे.

महाराष्ट्र परिवर्तन सेना या पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना पत्राव्दारे कळविले आहे की, महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना प्रथम करण्यात यावी असा मंत्री नंडळाचा ठराव घेऊन केंद्र सरकारला पाठविण्यात यावे. तसेच समान नागरी कायदा हा गोर-गरीब, दलित आदिवासी व अल्पसंख्यांक व गरीब मराठा आणि ओबीसी या समाजाला घातक आहे. समान नागरी कायद्याची देशात महाराष्ट्रात गरज नसून अम्गन प्रॉपर्टी वाटप करण्याची गरज आहे. आपण या पत्राचा जातीने विचार करुन सहानुभूतीपुर्वक विचार करुन योग्य निर्णय घ्याल, अशी अपेक्षा महाराष्ट्र परिवर्तन सेना पक्ष प्रमुख, अध्यक्ष धनराज थोरात, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र पारवे, कोषाध्यक्ष मनोहर धोरत, सदस्य बालाजी कांबळे यांनी पाठवलेल्या पत्रात व्यक्त केली आहे.

## सुसाट कार थेट ट्रकमध्ये घुसली, पती पत्नीसह एकाच कुटुंबातील 4 ठार

**लखनौ :** उत्तर प्रदेशमधील इटावामधून एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. आग्रा- कानपूर महामार्गावर चालकाला डोळा लागल्याने भरधाव कार ट्रकला धडकली. या अपघातामध्ये एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. या भयंकर घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. उत्तर प्रदेशातील इटावा येथे बुधवारी सकाळी भीषण रस्ता अपघात झाला. कानपूर- आग्रा महामार्गावर भरधाव वेगात असलेल्या कारने समोरून जाणाऱ्या ट्रकला जोरदार धडक बसली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातातील मृत आणि जखमी झालेले एकाच कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघात झालेली एर्टिगा कार दिल्लीहून हमीरपूरला जात होती. गाडीमध्ये एकाच कुटुंबातील सात जण प्रवास करत होते. यावेळी पिलखार गावाजवळ चालकाला डोळा लागल्याने त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी थेट समोरुन येणाऱ्या ट्रकला धडकली. अपघात इतका भयंकर होता की कार थेट ट्रक तोडून आतमध्ये शिरली.



# हमीभाव कायदा करा नाहीतर देशव्यापी आंदोलन पुकारु

## २५० पेक्षा जास्त शेतकरी संघटनांच्या बैठकीत केंद्र सरकारला इशारा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

शेतकऱ्याच्या शेतीमालासाठी हमीभाव कायदा झाला पाहिजे, नाहीतर देशव्यापी आंदोलन करु, असा इशारा २५० पेक्षा जास्त शेतकरी संघटनांच्या बैठकीत केंद्र सरकारला देण्यात आला. दिल्लीमध्ये रकाबगंज गुरूव्दार येथे एम. एस. पी. गॅरंटी किसान मोर्च्याच्या वतीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत २५ राज्यातून शेतकरी संघटनांचे नेते उपस्थित होते. महाराष्ट्रातील



**शेतकरी संघटना हरियाणा विधानसभा निवडणूक लढवणार**
*सरकारने हमीभाव कायद्यावर योग्य पावले उचलली नाही. तर हरियाणातील शेतकरी संघटना विधानसभा निवडणूक लढणार असल्याचे या बैठकीत ठरले आहे. या निवडणुकीतून जनमत शेतकरी संघटनेसोबत किती आहे? याची चाचपणी केली जाईल, असे राजू शेट्टी म्हणाले.*

स्वाभिनानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत हमीभाव, शेतकरी आंदोलन आणि आगामी विधानसभा निवडणुकीवर चर्चा झाली.

बैठकीनंतर बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, शेतकरी संघटनांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना पत्र देण्यात आले आहेत.

या पत्रांद्वारे केंद्र सरकारला देशात आणि राहुल गांधी यांना काँग्रेसशासित राज्यांमध्ये हमीभाव कायदा करण्याची विनंती करण्यात आली आहे. ते म्हणाले की, केंद्र सरकारने किमान हमीभावाचा कायदा पारित करावा या मागणीसाठी पुन्हा एकदा देशभरातील शेतकरी संघटनांनी एल्गार पुकारला आहे. पुढे बोलताना शेट्टी म्हणाले की, केंद्र सरकारने हमीभावाचा कायदा मंजूर केल्या देशातील शेती अर्थव्यवस्था मजबूत होईल.

या बैठकीस समन्वयक सरदार व्ही.एम. सिंग, राजाराम त्रिपाठी, चंद्रशेखर कुडेहाळी, आमदार यावर मीर, दयानंद पाटील, यांच्यासह देशभरातील विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी या उपस्थित होते.

पान ९ वरुन

**आता 'लाडका शेतकरी योजना' राबवणार**

जेव्हा नुकसान होतं तेव्हा आम्ही मदत करताना नियम बाजूला ठेवतो. आमच्या महायुतीच्या सरकारने लगेच मदत देण्याचं काम सुरू केलं, असंही एकनाथ शिंदे म्हणाले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, एक रुपयात विमा योजना देणार हे राज्य पहिलं आहे. किसान सन्मान निधातून केंद्र आणि राज्यातून आपण मोठा निधी दिला आहे. आमही शेतकऱ्यांना दिलेलं कधीही काढत नाही. विरोधक म्हणतात शेतकऱ्यांना काय दिल? आम्ही हे कधीही काढत नाही. आज राज्यातील शेतकऱ्यांचा कांद्याचा आणि दुधाचा प्रश्न सोडवायचा आहे. यासाठी तुम्ही थोडा प्रयत्न करा, अशी विनंतीही एकनाथ शिंदे यांनी शिवराज सिंह चौहान यांच्याकडे केली. आमच्या शेतकऱ्यांच्या कापसाला आणि सोयाबिनला चांगला भाव मिळाला पाहिजे, सोयाबिनला हेक्टरी पाच हजार आणि कापसाला पाच हजार रुपये हेक्टरी देण्याचा निर्णय घेतोय. यात दोन हेक्टर पर्यंत मर्यादा असेल, अशी घोषणाही शिंदे यांनी केली.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पोलंड दौऱ्याला सुरूवात**

या दौऱ्यात पोलंडमधील उत्साही भारतीय समुदायाशीदेखील पंतप्रधान संवाद साधणार आहेत. पोलंड भेटीनंतर पंतप्रधान युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या आमंत्रणाला मान देऊन युक्रेनला भेट देणार आहे. भारतीय पंतप्रधानांची आतापर्यंतची ही पहिलीच युक्रेन भेट आहे. भारत आणि युक्रेन यांच्यातील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्यासंदर्भात राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी संवाद साधण्याच्या दृष्टीने तसेच सध्या सुरु असलेल्या युक्रेन विवादावर शांततापूर्ण तोडगा काढण्याच्या दृष्टीने आपले विचार सामायिक करण्याबाबत आपण उत्सुक असल्याचे पंतप्रधानांनी म्हटले आहे. एक मित्र तसेच एक भागीदार म्हणून आम्हाला या भागात लवकरात लवकर शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्याची भारतास आशा असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, हा दौरा दोन्ही देशांतील व्यापक संपर्काची नैसर्गिक सातत्यता राखण्याचा मार्ग म्हणून काम करेल आणि येत्या काळात अधिक मजबूत आणि अधिक चैतन्यपूर्ण संबंधांचा पाया निर्माण करण्यात मदत करेल, असेही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले आहे.

## डॉ. संदीप घोष बेवारस मृतदेह विकायचे

**आर. जी. कर रुग्णालयातील माजी अधिकाऱ्याचा धक्कादायक आरोप**

**वृत्तसंस्था**
**कोलकाता**

कोलकाता येथील डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या धक्कादायक प्रकरणामुळे तेथील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय चर्चेत आल आहे. या ठिकाणी काम करणारे माजी अधीक्षक यांनी आता माजी प्राचार्य संदीप घोष यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. डॉक्टर संदीप घोष हे विविध बेकायदेशीर घटनांमध्ये अडकले होते. असं या माजी अधीक्षकांनी सांगितलं आहे. तसंच बलात्कार आणि हत्या प्रकरणातला आरोपी संजय रॉय हा संदीप घोष यांचा सेक्रेटरी म्हणून काम करायचा असंही त्यांनी म्हटलं आहे. अख्तर अली हे या रुग्णालय आणि महाविद्यालयात अधीक्षक म्हणून काम करत होते. त्यांनी ही धक्कादायक माहिती दिली आहे.

## झारखंड मुक्ती मोर्चामध्ये फूट?

# चंपई सोरेन यांनी केली नवा पक्ष स्थापण्याची घोषणा



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

विधानसभा निवडणूक तोंडावर असतानाच झारखंडमध्ये सत्ताधारी झारखंड मुक्ती मोर्चा पक्षामध्ये मोठी फूड पडण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. पक्षातील ज्येष्ठ नेते चंपई सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाला सोडचिठ्ठी देणार असल्याचे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. दरम्यान, आज चंपई सोरेन यांनी एक मोठी घोषणा केली आहे. त्यामुळे त्यांच्या भावी राजकीय वाटचालीबाबतचा अंदाज येत आहे. मी राजकारणातून निवृत्ती स्वीकारणार नाही, तर नव्या पक्षाची स्थापना करणार आहे. तसेच आपल्या आघाडी करण्यासाठी सर्व पक्षांसाठी दरवाजे उघडे ठेवले आहेत, असेही चंपई सोरेन यांनी सांगितले आहे.

आपल्या निर्णयाबाबत माहिती देताना झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपई सोरेन म्हणाले की, मी राजकारणातून निवृत्ती स्वीकारणार नाही. मी तीन पर्याय सांगितले होते. निवृत्ती, संघटना किंवा मित्र. आता मी निवृत्ती स्वीकारणार नाही. मी पक्षाला भक्कम बनवेन, नव्या पक्षाची स्थापना करेन. तसेच वाटेत कुणी चांगला मित्र भेटला तर त्याच्यासोबत पुढे जाईन.

माजी मुख्यमंत्री चंपई सोरेन यांनी दिल्लीहून परतल्यांतर समर्थकांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, चंपई सोरेन हे भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा करण्यात येत होता. मात्र मात्र हे दावे त्यांनी फेटाळून लावले आहेत. दरम्यान, समर्थकांशी विचारविनिमय केल्यानंतर चंपई सोरेन यांनी आपला वेगळा पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली आहे. पुढच्या सात दिवसांच्या आत संपूर्ण चित्र स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले आहे.

# भाजप कपटकारस्थानी पक्ष, या विधानसभा निवडणुकीत त्यांचा धुव्वा उडवू

## हेमंत सोरेन यांचा घणाघात

**वृत्तसंस्था**
**रांची**

इंडिया आघाडीची सत्ता असलेल्या झारखंडमध्ये यावर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार आहे. मात्र या निवडणुकीला काही दिवस असतानाच राज्यातील प्रमुख सत्ताधारी पक्ष असलेल्या झारखंड मुक्ती मोर्चामध्ये फूट पडणार असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच माजी मुख्यमंत्री चंपई सोरेन यांच्यासर काही आमदार हे भाजपामध्ये जाणार असल्याचे दावे केले जात आहेत. यादरम्यान झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी भाजपावर गंभीर आरोप केला आहे. भाजपाचे लोक कटकारस्थानी आहेत. ते केवळ समाजच नाही तर घर, कुटुंब आणि पक्ष तोडण्यामध्ये गुंतले आहेत, असा आरोप सोरेन यांनी केला.



झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी गोड्डा येथे अनेक विकास योजनांचं उदघाटन आणि भूमिपूजन केलं. त्यावेळी झालेल्या सभेला संबोधित करताना सांगितले की, २०१९ मध्ये जेव्हा आमचं सरकार सत्तेवर आलं तेव्हापासून यांची कपटकारस्थानं सुरू आहेत. मात्र आमच्या इंडिया आघाडीच्या सरकारने सातत्यपूर्ण वाटचाल केली आहे.

कोरोनाकाळात आमच्या सरकारमधील तीन मंत्र्यांचा जनतेचं काम करताना मृत्यू झाला होता. आम्ही मागे हटणारे नाही आहोत. या निवडणुकीत आम्ही या राज्यामधून भाजपाचा धुव्वा उडवू. कधी या आमदाराला खरेदी कर, कधी त्या आमदारला खरेदी कर हे यांचं कामच आहे. पैसा ही अशी गोष्ट आहे ज्याच्या जोरावर नेते आणि आमदारांना इकडून तिकडे जाण्यास वेळ लागत नाही. भाजपा गुजरात, महाराष्ट्र, आसाम येथून आपल्या नेत्यांना इथे आणून येथील आदिवासी, दलित आणि अल्पसंख्याकांशी लढवण्याचं काम करत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

# आंध्र प्रदेशातील फार्मा फॅक्टरीला आग 13 जणांचा मृत्यू, 17 जण जखमी

**वृत्तसंस्था**
**बंगळुरु**

आंध्र प्रदेशातील अनकापल्ले जिल्ह्यातील एका फार्मा कारखान्याला लागलेल्या आगीत 17 जणांचा मृत्यू झाला. तर 30 हून अधिक जण जखमी झाले आहेत. आगीचे कारण समजू शकलेले नाही. आग लागल्यानंतर स्फोटाचा आवाज आल्याचे प्रत्यक्षदर्शींनी



सांगितले. स्फोट इतका जोरदार होता की इमारतीच्या पहिल्या मजल्याचा स्लॅब कोसळला.

ही घटना अच्युतपुरम सेझमधील फार्मा कंपनी एसशियंटियाच्या प्लांटमध्ये घडली. जखमींना उपचारासाठी एनटीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जेव्हा स्फोट झाला तेव्हा दुपारच्या जेवणाची वेळ होती आणि बहुतेक कामगार बाहेर होते.

कारखान्यात 381 हून अधिक कर्मचारी काम करतात. दुपारी 2.10 वाजता हा अपघात झाला. जेवणाची वेळ असल्याने बहुतांश कर्मचारी बाहेरच होते. जिल्हाधिकारी विजयन कृष्णन यांनी सांगितले की, 13 जणांचे रेस्क्यू करण्यात आले आहे.

# कुवेत अग्निकांडांनंतर कठोरता, भारतीयांवर बेघर होण्याचे संकट

## कारवाईच्या भीतीने घरे रिकामी करून घेत आहेत मालक

**वृत्तसंस्था**
**कुवेत**

कुवेतमधील मंगफ भागात १२ जून रोजी सात मजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीत ४९ लोकांचा मृत्यू झाला, ज्यात बहुतांश भारतीय होते. या इमारतीत २०० हून अधिक लोकांनी आश्रय घेतला होता. या घटनेनंतर कुवेत सरकारने स्थलांतरित कामगारांसाठी असुरक्षित समजल्या जाणाऱ्या सार्वजनिक इमारतींवर कडक कारवाई सुरू केली. बिल्डिंग कोडचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड करण्यात येत आहे. कुवेत सरकारच्या या निर्णयाचा भारतासह आशियाई देशांतील स्थलांतरितांवर विपरीत परिणाम होत आहे. आता भारतीयांना राहण्यासाठी जागा मिळत नाही. कारवाईच्या भीतीने, मालकांनी अनेकांना घर सोडण्यास भाग पाडले. प्रत्यक्षात, कुवेतच्या गृह मंत्रालयाने इशारा दिला होता की, अनेक वेळा व्हिसा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि निवासस्थानाशिवाय स्थलांतरित कामगारांना अटक केली जाईल.

कुवेतच्या ४३ अंश सेल्सिअस भीषण उष्णतेमध्ये चार भारतीय स्थलांतरित कामगार त्यांचे सामान बॅगांमध्ये भरून रस्त्याच्या कडेला उभे होते. त्यापैकी ५२ वर्षीय सुरेश कुमार व सहकाऱ्यांना मंगफ दुर्घटनेनंतर बिल्डिंग कोडचे उल्लंघन केल्याबद्दल अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेजारी छापा टाकल्यामुळे नुकतेच बाहेर काढण्यात आले. एका अपार्टमेंटच्या तळमजल्यावर १७२ स्क्वेअर फुटांच्या खोलीत ते राहत होते, पण तळमजल्यावर राहण्यास मनाई आहे, म्हणून मालक खोल्या पाडत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आता ते बेघर झाले आणि कुठे जायचे ते कळत नव्हते. ते कुवेतच्या सरकारी मालकीच्या तेल शुद्धीकरण कंपनीसाठी काम करणारे बांधकाम कामगार आहेत. हे चौघेही २७ हजार रुपये भाडे देऊ शकतात. मात्र आता त्यांना दुप्पट किमतीतही जागा मिळत नाही.

## कोलकाता रेप-हत्या प्रकरण, 2 ACP सह 3 पोलिस निलंबित

**कोलकाता**


कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्याप्रकरणी पश्चिम बंगाल सरकारने बुधवारी दोन सहायक पोलिस आयुक्तांसह तीन अधिकाऱ्यांना निलंबित केले. 15 ऑगस्ट रोजी रात्री उशिरा हजारोंच्या जमावाने आरजी कार मेडिकल कॉलेज हॉस्पिटलची तोडफोड केली. याच प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सीआयएसएफने आरजी कार मेडिकल कॉलेजची सुरक्षा ताब्यात घेतली आहे. सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी रुग्णालयात पोहोचून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. रुग्णालयातील तोडफोडीनंतर न्यायालयाने सीआयएसएफला सुरक्षा व्यवस्था सांभाळण्याचे निर्देश दिले होते. दुसरीकडे, रुग्णालयाचे माजी उपअधीक्षक अख्तर अली यांनी माजी प्राचार्य संदीप घोष यांच्याविरोधात कोलकाता उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

## 10हून अधिक जणांचा महिलेवर सामूहिक बलात्कार

**वृत्तसंस्था**
**छत्तीसगड**

छत्तीसगडच्या रायगडमध्ये एका आदिवासी महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. ही महिला रक्षाबंधनाच्या दिवशी जत्रेवरून परतत असताना ही घटना घडली. आरोपींमध्ये महिलेचा एक मित्र आणि त्याच्या 10 साथीदारांचा समावेश आहे.

यापकरणी पोलिसांनी 7 आरोपींना अटक केली आहे. हे प्रकरण पुसौर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे. पुसौर ब्लॉकमध्ये राहणारी 27 वर्षीय महिला काही वर्षांपासून पतीपासून वेगळी




राहत होती. सोमवारी ती तिच्या ओळखीच्या लोकांसह मीना बाजार येथे गेली होती. तेथून परतत असताना एनटीपीसी लाराजवळ काही लोकांनी पकडून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. याप्रकरणी मंगळवारी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. आदिवासी महिलेवर झालेल्या सामूहिक बलात्कारात महिलेचा मित्र आणि त्याचे 10 साथीदार सहभागी आहेत. ही महिला आपल्या मित्रासोबत परतत होती. त्याने आधी बलात्कार केला. यावेळी आरोपी तरुणाचे साथीदारही आले आणि त्यांनीही महिलेवर बलात्कार केला. घटनेनंतर सर्व आरोपी तेथून पळून गेले. त्यानंतर महिलेने कसेतरी पोलीस ठाणे गाठून एफआयआर दाखल केला.

# युक्रेन युद्धात 6 लाख रशियन सैनिकांचा मृत्यू

## आठ हजार रणगाडे उद्ध्वस्त; युक्रेनने कुर्स्कमधील तिसरा पूलही पाडला

**वृत्तसंस्था**
**मॉस्को**

रशिया-युक्रेन युद्धात 6 लाखांहून अधिक रशियन सैनिकांचा मृत्यू झाला आहे. युक्रेनियन वेबसाइट कीव इंडिपेंडंटच्या मते, युक्रेनियन आर्मीच्या जनरल स्टाफने सांगितले की, 24 फेब्रुवारी 2022 रोजी युक्रेनवर झालेल्या हल्ल्यापासून आतापर्यंत 6,03,010 रशियन सैनिकांनी आपला जीव गमावला आहे.



जनरल स्टाफने टेलिग्रामवर सांगितले की, गेल्या अडीच वर्षांत युक्रेनने 8,522 रशियन रणगाडे, 16,542 चिलखती वाहने, 17,216 तोफखाने, 1,166 रॉकेट यंत्रणा, 928 हवाई संरक्षण यंत्रणा, 367 विमाने, 328 हेलिकॉप्टर्स, 28 जहाज आणि 1 पाणबुडी नष्ट केली आहे. मंगळवारी 1,210 रशियन सैनिक मारले गेल्याचा दावा त्यांनी केला. त्याच वेळी, रशियन लष्कराने सोशल मीडियावर दावा केला आहे की मंगळवारी युक्रेनचे 2,000 हून अधिक सैनिक मारले गेले.

रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने हे चित्र प्रसिद्ध केले आहे. यामध्ये रशियन सैन्य युक्रेनच्या तळावर हल्ला करत आहे. ठिकाणाबद्दल कोणतीही माहिती नाही. कुर्स्कमधील हल्ल्यामुळे संतप्त झालेल्या रशियन सुरक्षा परिषदेचे उपप्रमुख दिमित्री मेदवेदेव म्हणाले की, युक्रेन आणि रशिया यांच्यातील संवादाचे सर्व मार्ग बंद करण्यात आले आहेत. पुतीन यांच्या आधी मेदवेदेव हे रशियाचे अध्यक्ष होते. जोपर्यंत युक्रेनचा पूर्ण पराभव होत नाही तोपर्यंत चर्चेला काहीच अर्थ नाही, असे त्यांनी सोशल मीडियावर म्हटले आहे. खरे तर गेल्या अडीच वर्षांपासून रशियन आक्रमणाचा सामना करणाऱ्या युक्रेनियन लष्कराने आता पलटवार सुरू केला आहे. 6 ऑगस्ट रोजी युक्रेनने रशियाच्या कुर्स्क भागात हल्ला केला. राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या 15 दिवसांत युक्रेनच्या सैन्याने रशियातील कुर्स्कमधील 92 गावे ताब्यात घेतली आहेत.

राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी दावा केला आहे की युक्रेनियन सैन्याने 1250 चौरस किमी रशियन प्रदेश ताब्यात घेतला आहे. युक्रेनचे लष्करप्रमुख अलेक्झांडर सिरस्की यांनी सांगितले की, युक्रेनचे सैन्य रशियाच्या 35 किमी आत घुसले आहे. बीबीसीने दिलेल्या माहितीनुसार, युक्रेनने अचानक केलेल्या हल्ल्यानंतर 2 लाखांहून अधिक रशियन नागरिकांना घर सोडून पळून जावे लागले आहे.

# टिटवाळा शहरात रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न

**वृत्तसंस्था**
**टिटवाळा**

"एकतेचे प्रतीक आहे रक्तदान चला प्रयत्न करूनी वाचवूया एखाद्याचे प्राण" या संकल्पनेतून नुकतेच रिजेन्सी सर्वम क्लब हाऊस,टिटवाळा येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

रेड स्वस्तिक सोसायटी, रिजेन्सी सर्वम फाऊंडेशन , सांगड सामाजिक संस्था , गंधर्व गुरुकुल , रिजेन्सी सर्वम को. ऑ.हौ.सो. लिमीटेड व कल्याण केमिस्ट ॲंड ड्रगिस्ट असोसिएशन (टिटवाळा झोन) यांच्या संयुक्त विद्यामानाने सामाजिक भान जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




या रक्तदान शिबिरात "समाजसेवेचे भान रक्तदान श्रेष्ठदान" मानून सामाजिक बांधिलकी जपत टिटवाळ्यातील पुरुष, महिला व दिव्यांग व्यक्तीने सहभाग घेऊन ६३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सदर रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती रूग्नालय उल्हासनगर -३ यांच्या रक्तकेंद्र विभागाचे डॉक्टर व कर्मचारी तसेच आयोजकांच्या सर्व टीमचे सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते.

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



अद्वय रुपेश अंबोकर
३ रा वाढदिवस
जन्म - २२-०८-२०२१
शुभेच्छुक
मम्मी- पप्पा, काका काकी, आत्या , आजी , दादा, माही, भूमि, दुर्वा आणि आंबोकर परिवार.